अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222


संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

महेंद्र पेंडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०६.०३.२०२६ | अंक नं. २७९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
संपर्क : ७७२२ ०१० २२२
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
१ डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# शिवजयंती मिरवणुकीसाठी रात्री १० वाजेपर्यंतच परवानगी; ३ मंडळांचा सहभाग, शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात

नगर - तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीनिमित्त शुक्रवारी (६ मार्च) शहरातून पारंपरिक वाद्यांसह डीजेच्या दणदणाटात मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीसाठी प्रशासनाने रात्री १० वाजेपर्यंतच परवानगी दिली आहे. अहिल्यानगर शहर शिवसेनेसह सागर मुर्तडकर यांचे वर्चस्व ग्रुप, नगरसेवक सुभाष लोंढे यांचे जय तुळजाभवानी मंडळ अशी ३ मंडळे मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. त्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून दुपारनंतर मिरवणूक सुरू होईल. पारंपरिक मार्गावरुन म्हणजेच माळीवाडा, पंचपीर चावडी, आशा टॉकीज, माणिक चौक, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलिखुंट, चितळे रस्ता, चौपाटी कारंजामार्गे दिल्लीगेट येथे मिरवणुकीचा समारोप होईल. मिरवणुकीच्या अग्रभागी पारंपरिक वाद्य पथक असेल. मिरवणूक सुरू असताना मार्गावरील वाहतूक बंद राहणार आहे. संपूर्ण मार्गावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सीसीटीव्ही व ड्रोन कॅमेऱ्याद्वारे मिरवणुकीतील हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. शहर शिवसेनेने रात्री १२ वाजेपर्यंत मिरवणुकीला परवानगी देण्याची मागणी केली होती. मात्र ती प्रशासनाने नाकारली असून मिरवणुकीतील डीजे व इतर वाद्ये रात्री १० वाजताच बंद होणार आहेत.

### मिरवणुकीसाठी असा असेल बंदोबस्त

मिरवणुकीसाठी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलिस उपअधीक्षक (१ शहर व १ आर्थिक गुन्हे शाखा), कोतवाली, तोफखाना, स्थानिक गुन्हे शाखा, नियंत्रण कक्ष, शहर वाहतूक शाखा, मानव संसाधन व महिला व बाल अपराध कक्षाचे असे ८ पोलिस निरीक्षक, २० सहाय्यक निरीक्षक व उपनिरीक्षक, २५० पोलिस कर्मचारी, ८० होमगार्ड, राज्य राखीव दल व दंगल नियंत्रण पथकाची प्रत्येकी एक तुकडी असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




तिथीनुसार शिवजयंती निमित्त दिल्लीगेट येथील नगरसेवक श्रीपाद छिंदम यांच्या छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने 'हरहर महादेव' हा भव्य दिव्य देखावा सादर केला आहे. (छाया - लहू दळवी)

ईलाज बिना ऑपरेशन उपाय गॅरन्टीने
* वघळलेले, तुटलेले कान चिटकवा
* त्वचा- पिंपल्स,काळे डाग, व्रण, मोस काढणे, टॅटू पुसुन टाकणे, कपाळाचे गोंधण काढणे
* सगळे व्यसन दारु, मिश्री, मावा सोडा
* डाबेटीस घालवा
* HIV CD4 वाढवा
डॉ. मंजुषा 7507718246
माळीवाडा मंदिराजवळ, अ.नगर

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्समर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999


१५ वा स्मृतिगंध
स्व. विनोदजी आत्मारामजी अग्रवाल
स्व. दि. ६ मार्च २०११
तुमची सावली आजही आमच्यासोबत आहे..
तुमचं मोठं मन, तुमचा दिलखुलास स्वभाव,
आणि इतरांच्या मदतीसाठी नेहमी सर्वात पुढे उभं राहणं
आजही आम्हाला प्रेरणा देतं...
बाहेरून कधी कधी कडक, पण मनाने अतिशय मऊ आणि कोमल
तुम्ही आम्हाला शिकवलंत माणुसकी हीच खरी ओळख आहे...
प्रत्येक यशाच्या क्षणी तुमची उणीव जाणवते, फक्त एकदा पुन्हा
तुमचा हात डोक्यावर असावा असं वाटतं.
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली..
अग्रवाल परिवार
अहिल्यानगर । पुणे

ऑफर खास, डिस्काऊंट हमखास..
महिलादिनानिमित्त विशेष डिस्काऊंट
25% डिस्काऊंट
ब्रॅन्डेड सारीज । डिझाईनर सारीज
टॉप्स । कुर्तीज । ड्रेस मटेरियल
ऑफर 5 ते 8 मार्च 2026 पर्यंत वैध
Conditions Apply
रंगीबेरंगी वस्त्रांचं अथांग विश्व..
आशिर्वाद
- लक्ष्मीपती डिझाईनर साडी स्टुडिओ -
गुरु गणेश कॉम्प्लेक्स, माळीवाडा, अहिल्यानगर
फोन : 0241-2425111 / 9260278511

ओम शांति

अत्यंत दु:ख के साथ सूचित किया जाता है कि हमारे पूजनीय पिताजी
स्व.श्री. पवनकुमार हरबंसराज अत्री जी
का स्वर्गवास बुधवार ता. २५/०२/२०२६ को हुआ है
उठाला (पगडी रसम)
शनिवार ता. ०७/०३/२०२६ को,
समय : दोपहर ३.०० से ४.०० बजे तक,
स्थान : गुरुद्वारा साहिब भाई दया सिंह जी, गोविंदपुरा, अहिल्यानगर
* शोकाकुल *
अशोक हरबंसराज अत्री (भाई) सुभाष हरबंसराज अत्री (भाई)
कपिल पवनकुमार अत्री (पुत्र) विक्रम राजिव वर्मा (जवाई)
अमित कमलकुमार अत्री (भतीजा) नितिन कमलकुमार अत्री (भतीजा)
एवं समस्त अत्री परिवार
फर्म : कपिल स्पोर्टस् बुटीक
Mo. 9527777924 / 9890627197

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सरकारी काम अन् तीन वर्ष थांब; भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक श्रेणीसाठी सरकारची अट

नगर – सरकारी काम अन् तीन महिने थांब अशी सर्वसाधारण म्हण प्रचलित आहे. मात्र, आता सरकारच्याच भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांसमोर सरकारने तीन वर्ष थांबण्याची अट घातली असल्याची माहिती समोर आली आहे. बुधवारी भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या विविध मागण्यांबाबत संघटनेच्या शिष्टमंडळाशी महसूल आयुक्तांनी चर्चा केली. संघटनेच्या मागणीप्रमाणे भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक यांना तांत्रिक श्रेणी लागू करण्याबाबतचा आदेश काढला जाईल. मात्र, त्याची अंमलबजावणी तीन वर्षांनंतर होईल, अशी अट सरकारच्यावतीने घालण्यात आली आहे. त्यामुळे संघटनेने काम बंद आंदोलन सुरुच ठेवले असल्याची माहिती संघटनेचे विभागीय अध्यक्ष रवी डिक्रूज यांनी नवा मराठाशी बोलताना दिली.

भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे तांत्रिक वेतनश्रेणी व इतर मागण्यांसाठी २ मार्चपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरु आहे. विभागातील कर्मचाऱ्यांचे कामकाज हे लिपीक संवर्गाचे नसून तांत्रिक दर्जाचे आहे. त्यामुळे वेतनही तांत्रिक श्रेणीचे मिळावे, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे. याबाबत संघटनेचे विभागीय अध्यक्ष रवी डिक्रूज यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, भूमि अभिलेख विभागातील कनिष्ठ लिपिक संवर्गाकडून भूकरमापकाचे तांत्रिक काम करुन घेतले जाते. विशेष म्हणजे सध्या सर्व अद्ययावत तांत्रिक मशीनद्वारे जमिनींची मोजणी केली जाते. मशीनद्वारेच जमिनीचा नकाशा तयार केला जातो. त्यासाठी जीपीएस तंत्रज्ञानावर चालणारी रोव्हर मशीन सरकारने घेतल्या आहेत. या सर्व मशीन कनिष्ठ लिपिक चालवतात. वास्तविक ही मशीन चालविण्यासाठी तांत्रिक व्यक्तीची गरज आहे. त्यासाठी मशीनचे ज्ञान, जीपीएसचे तांत्रिक ज्ञान असणे बंधनकारक आहे. तांत्रिक पद्धतीने नकाशा तयार करावा लागतो. भूकरमापक हे पूर्णपणे तांत्रिक काम आहे. मात्र, हे काम करणाऱ्यांना कनिष्ठ लिपिक दर्जाचे वेतन दिले जाते. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. एकीकडे सरकारच्या विभागातील ट्रेसर हा तांत्रिक वेतनश्रेणीस लागू असतो. मात्र, भूकरमापकला तांत्रिक वेतनश्रेणी लागू केली जात नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. गेल्या १४ वर्षांपासून आम्ही सरकार दरबारी ही मागणी मांडत आहोत. मात्र, आम्हाला न्याय मिळत नाही. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. आता सरकार तांत्रिक वेतनश्रेणी बाबत आदेश काढायला तयार झाले आहे. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी तीन वर्षांनंतर होईल, अशी अट सरकारकडून घालण्यात आली आहे. आम्हाला ती मान्य नाही. ज्या दिवसापासून आदेश निघेल, त्या दिवसापासून अंमलबजावणी करावी, अशी मागणी आहे, असे डिक्रूज यांनी सांगितले.

दरम्यान भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे बुधवारी संघटनेशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा करणार होते. मात्र, त्यांच्यावतीने महसूल आयुक्त प्रमोद नवल यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाशी पुण्यात चर्चा केली. सरकारच्यावतीने भूमि अभिलेख कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाशी चर्चेची ही तिसरी फेरी पार पडली. मात्र, या चर्चेत तीन वर्षाची अट कर्मचाऱ्यांना मान्य झाली नाही. त्यामुळे चर्चेची तिसरी फेरी निष्फळ ठरली व आंदोलन सुरुच राहिले.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीप्रमाणे जयंती निमित अभिवादन करताना मनसे उपशहराध्यक्ष दिपक दांगट, डॉ. संतोष साळवे, धीरज लालवानी, विजय राठोड़, ॲड. अनिता दिघे, समीर शेख आदि.

## श्रीमती जनाबाई ठुबे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पाईपलाईन येथील रहिवासी श्रीमती जनाबाई पाराजी ठुबे (वय ७१) यांचे ६ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. योगेश ठुबे यांच्या त्या मातोश्री होत.

## आनंदबाई चोरडीया यांचे वृद्धापकाळाने निधन

भिंगार – येथील रहिवासी आनंदबाई मांगीलाल चोरडीया (वय ८८) यांचे ६ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक प्रकाश, राजेंद्र, दिलीप, संजय चोरडीया यांच्या त्या मातोश्री होत.



## सुनिल साळुंके यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील पल्लवी केमिकल्सचे मालक व नॉर्दन ब्रँच हरिनाम सप्ताह कमिटीचे अध्यक्ष सुनिल ज्ञानदेव साळुंके (वय ६०) यांचे ५ मार्च रोजी सायंकाळी ५ वा. अहिल्यानगर येथील हॉस्पिटल येथे अल्प आजाराने दु:खद निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहीण, मुलगी, पुतणे, जावई असा परिवार आहे. किशोर साळुंके यांचे थोरले बंधू होत.

## सोपान हरदास यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील माजी सैनिक व पंचायत समितीचे सेवानिवृत्त कर्मचारी सोपान बाबुराव हरदास (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले.

दत्तात्रय सखाराम हरदास यांचे चुलत बंधू, पंकज (रवि) हरदास यांचे वडील, श्रीकांत रत्नाकर हरदास यांचे चुलते होत.

## उमेश मैड यांचे अपघाती निधन

श्रीरामपूर – पटेल हायस्कूल जवळ, पूर्णवादनगर, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर येथे पूर्वी वास्तव्यास असलेले उमेश गणपतराव मैड (वय ३८) यांचे ढवळपुरी फाटा, पारनेर येथे अपघाती निधन झाले. ६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता केडगाव, अहिल्यानगर येथील अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.



त्यांच्या पश्चात आई – वडील, पत्नी, भाऊ, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. सोमनाथ रघुनाथ महाले यांचे मेहुणे होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**शनिवार दि. ७/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**नानासाहेब भवर पाटील,** सिद्धीविनायक हौ. सोसा. रेणावीकर शाळे समोर, भिडे चौक, सावेडी नाका ९८२२२६८९९८

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**श्रीकृष्ण दूध डेअरी,** मल्हार चौक, स्टेशन रोड, मारुती कलागते ७०८३६३३०३३

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**
**रविकांत नंदलाल काबरा एवं परिवार** महेशनगर, जुन्या आरटीओ कार्यालयाजवळ, ९२२५१२२१५१

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**
**श्री रोकडेश्वर हनुमान मंदिर,** राजू पगारे व पंकज भुतारे रोकडेश्वर हनुमान मंदिर, जॉगींग पार्कजवळ, भिंगार

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**
**व्यंकटेश पतके,** साई श्रद्धा बंगला, दक्षिणमुखी मारुती मंदिर जवळ, पाथर्डी रोड, भिंगार ९०२८०८८५६७

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी पोलीस ‘ॲक्शन मोडवर’

## कर्णकर्कश डीजेवर कारवाईचा इशारा, ३७ जणांना दिल्या नोटीसा

नगर – शहरात मंगल कार्यालय, लॉन तसेच विविध कार्यक्रमांमध्ये कर्णकर्कश आवाजात डीजे व डॉल्बी साऊंड सिस्टीम वाजविणार्यांवर ध्वनीप्रदूषण नियंत्रण कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा अहिल्यानगर शहर पोलिसांनी दिला आहे. पोलीस प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून हॉस्पिटल, शाळा, महाविद्यालये, धार्मिक स्थळे तसेच निवासी परिसरात मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपक वापरल्यास संबंधित डीजे चालक–मालक, मंगल कार्यालयाचे मालक आणि जनरेटर वाहन मालकांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ तसेच ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

या संदर्भात अहिल्यानगर शहरातील एकूण ३७ डीजे व डॉल्बी चालक–मालक, मंगल कार्यालयांचे मालक आणि जनरेटर वाहन मालकांना भारतीय न्याय दंड संहिता कलम १६८ नुसार नोटीस बजावण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. यापूर्वी शहरातील विविध भागात डीजे व डॉल्बी सिस्टीम कर्णकर्कश आवाजात वाजविण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ध्वनीमापक यंत्राव्दारे नियंत्रण नमुने (कंट्रोल सॅम्पल) घेण्यात आले असून संबंधितांवर पर्यावरण व ध्वनीप्रदूषण कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे. पोलीस प्रशासनाने मंगल कार्यालय, लॉन आणि सांस्कृतिक सभागृह मालकांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. कार्यक्रमासाठी जागा भाड्याने देताना आयोजकांनी ध्वनीक्षेपकाचा परवाना घेणे बंधनकारक असल्याची सूचना देणे आवश्यक आहे. तसेच रात्री १० वाजल्यानंतर कोणतेही वाद्य वाजवू नये, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा आणि कार्यक्रमांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

याशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर ठरवून दिलेल्या वेळेतच करावा व ध्वनी मर्यादेचे पालन करणे बंधनकारक आहे. रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. शासकीय कार्यालये, न्यायालये, दवाखाने, शाळा, महाविद्यालये व धार्मिक स्थळांच्या परिसरात मोठ्या आवाजात स्पीकर वापरण्यास मनाई आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शांतता झोन, निवासी झोन, वाणिज्य झोन आणि औद्योगिक झोन यासाठी निश्चित डेसिबल मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. दरम्यान, शहरात कुठेही अशा प्रकारे कर्णकर्कश आवाजात डीजे किंवा ध्वनीक्षेपक वाजविले जात असल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले आहे.



जिल्ह्यातील शिर्डी, राहुरी व श्रीगोंदा तालुक्यातील औद्योगिक वसाहतींच्या संदर्भात मंत्रालयात आयोजित उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये बोलताना ना. राधाकृष्ण विखे पा.

# अहिल्यानगर जिल्हा लवकरच औद्योगिक विकासाचे केंद्र होणार

### नामदार राधाकृष्ण विखे

शिर्डी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अहिल्यानगर जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत असून, जिल्हा लवकरच औद्योगिक विकासाचे केंद्र बनेल. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही निश्चित वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जिल्ह्यातील शिर्डी, राहुरी व श्रीगोंदा तालुक्यातील औद्योगिक वसाहतींच्या संदर्भात मंत्रालयात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या परिसरात औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी औद्योगिक क्षेत्र उभारणीतील सर्व अडचणी दूर करून प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिली.

शिर्डी येथील औद्योगिक वसाहतीबरोबरच राहुरी आणि श्रीगोंदा तालुक्यातही औद्योगिक वसाहती उभारण्याच्या कामावर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राहुरी तालुक्यात कृषी विद्यापीठाची जागा औद्योगिक विकासासाठी उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रस्तावित औद्योगिक वसाहतींमुळे अहिल्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

# वाहतूक शाखेकडून शहरात कारवाई; १९९ वाहनांवर ई–चलान

## ५० हजारांहून अधिक दंड वसूल

नगर – शहरातील बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी शहर वाहतूक शाखेकडून गेल्या आठवड्यापासून रोज कारवायांचा धडाका सुरु आहे. शहरातील विविध चौकात रोज बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. गुरुवारी सायंकाळी आनंदधाम चौक व पत्रकार चौक येथे नाकाबंदी करून नियमभंग करणाऱ्या १९९ वाहनचालकांवर कारवाई करीत ५० हजार २५० रुपयांचा रोख दंड वसूल करण्यात आला. तर २ लाख १५ हजार ६५० रुपयांचा दंड प्रलंबित आहे.

शहर वाहतूक शाखेने ४ मार्च रोजी आनंदधाम चौक आणि ५ मार्च रोजी पत्रकार चौक येथे अचानक नाकाबंदी केली. या दरम्यान विविध प्रकारचे वाहतूक नियमभंग आढळून आले. त्यानुसार मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली.कारवाईदरम्यान काळी काच असलेल्या ६ वाहनांवर, लायसन्स सोबत न बाळगणाऱ्या ३१ वाहनचालकांवर, लायसन्स नसलेल्या २ जणांवर, ट्रिपल सीट वाहन चालविणाऱ्या २२ जणांवर, नंबर प्लेट नसणे किंवा फॅन्सी नंबर प्लेट लावल्याप्रकरणी १३३ वाहनांवर, फटाका सायलेंसर वापरणाऱ्या २ वाहनांवर, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या १ वाहनावर, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या २ जणांवर तसेच इतर ३१ प्रकरणांसह एकूण १९९ ई–चलान कारवाई करण्यात आली. यामध्ये ५० हजार २५० रुपयांचा रोख दंड वसूल करण्यात आला असून २ लाख १५ हजार ६५० रुपयांचा दंड प्रलंबित आहे.



शहरातील बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी शहर वाहतूक शाखेकडून गेल्या आठवड्यापासून रोज कारवायांचा धडाका सुरु आहे. (छाया – लहू दळवी)

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या आदेशान्वये शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक मन्सुर सय्यद, असिफ शेख, सहाय्यक फौजदार रामराव शिरसाट, कोडम, पोलीस हवालदार गणपत कर्डीले, जहिर शेख, पोलीस शिपाई दिपक सरोदे, मधुकर ससे, उंडे, आबासाहेब चव्हाण, अजय जपकर, सुरज शिंदे, सतिश दळवी, प्रविण खंडागळे, गडदे तसेच वॉर्डन अरविंद चोटिले, निखिल कारखेले, संदीप शेंडगे व रोडे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, नागरिकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, वाहनांवर काळ्या काचा लावू नयेत, फॅन्सी नंबर प्लेट किंवा नोंदणी क्रमांकाविना वाहन चालवू नये, फटाका सायलेंसरचा वापर करू नये तसेच मद्यपान करून वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन शहर वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.



१७ मार्च रोजी मुंबई येथे अखिल गुरव समाज संघटनेच्या वतीने होणाऱ्या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील पदाधिकारी व गुरव समाज बांधवांची नियोजन बैठक बुऱ्हाणनगर येथे पार पडली.

# गुरव समाजाचे १७ मार्चला मुंबईत आंदोलन

नगर – गुरव समाजाच्या विविध मागण्यांसाठी १७ मार्चला मुंबई येथे अखिल गुरव समाज संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील पदाधिकारी व गुरव समाज बांधवांची नियोजन बैठक बुऱ्हाणनगर येथे पार पडली.

या बैठकीला अखिल गुरव समाज संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष विजय शिंदे, प्रदेश सरचिटणीस सुभाष शिंदे आणि प्रदेश महिला अध्यक्षा मनिषाताई पांडे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत शेलार, योगेश वाघ, मनोहर जाधव, संतोष केदारी, डॉ. सुरेश थोरात, विनायक धुमाळ, शिवदास शिंदे, उमेश शिर्के आदी उपस्थित होते. बैठकीत अखिल गुरव समाज संघटनेचे दक्षिण जिल्हाध्यक्ष महेश शिर्के यांनी मुंबईत होणाऱ्या आंदोलनाबाबत माहिती दिली. त्यानंतर गुरव समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

राज्यातील देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनी निखलास पद्धतीने खालसा करून संबंधित सनदधारक वहिवाटदारांना देणे, शासन परिपत्रक ३१ मे १९९६ ची काटेकोर अंमलबजावणी करणे, ७/१२ उताऱ्यातील नोंदी पूर्ववत कब्जेदार सदरी करणे, देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनी सार्वजनिक कामासाठी घेतल्यास बाजारभावाने मोबदला देणे, जमिनी विकासासाठी अनुदान व बँक कर्ज उपलब्ध करून देणे तसेच बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनी मूळ वहिवाटदारांच्या नावे करणे, देवस्थान ट्रस्टमध्ये गुरव (पुजारी) यांना ५० टक्के विश्वस्त म्हणून स्थान देण्यासाठी कायदा करणे, कमी उत्पन्न असलेल्या देवस्थानांतील पुजाऱ्यांना दरमहा पाच हजार रुपये मानधन देणे, मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० मधून देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनी वगळणे, प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहासाठी जमीन उपलब्ध करून देणे, विशेषतः कोकण विभागात ओबीसी दाखले देणे, ओबीसी महामंडळाचा निधी जातनिहाय देणे आणि पी. एम. विश्वकर्मा योजनेमध्ये गुरव समाजाचा समावेश करणे या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. मुंबईत होणाऱ्या आंदोलनास जिल्ह्यातील गुरव समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले.

पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेवकपदी सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल विजय शिंदे यांचा अखिल गुरव समाज संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय उपाध्यक्षा सुरेखाताई तोरडमल यांनी आभार मानले.

# केडगाव येथे कामगारावर टोळक्याचा प्राणघातक हल्ला

नगर – मोबाईल जेसीबी खाली सापडून फुटल्याने दोन कामगारांमध्ये वाद झाले. त्यातील एकाने घरी जावून त्याच्या १० साथीदारांना घेवून येत परप्रांतीय कामगाराला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत दगडांनी ठेचून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना केडगाव – सोनेवाडी रोडवर असलेल्या निशा इन्फ्रास्ट्रक्चरच्या आरएमसी प्लँटमध्ये घडली. या हल्लयात शाबीर अन्सारी (मूळ रा. झारखंड, हल्ली रा. सोनेवाडी, ता. नगर) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

याबाबत त्याचा सहकारी जहागीर हलीम अन्सारी (मूळ रा. झारखंड, हल्ली रा. सोनेवाडी, ता. नगर) याने ५ मार्च रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व जखमी हे निशा इन्फ्रास्ट्रक्चरच्या आरएमसी प्लँटमध्ये कामगार आहेत. त्याच ठिकाणी विशाल नावाचा तरुण हा जेसीबी चालक आहे. २ मार्च रोजी सकाळी जखमी शाबीर अन्सारी याने जेसीबीवर त्याचा मोबाईल ठेवला होता. विशाल याने जेसीबी अचानक चालू केल्याने तो मोबाईल जेसीबी खाली पडून फुटला. त्यामुळे दोघांमध्ये वाद झाले. ते काही वेळात मिटले होते. त्यानंतर दुपारी ४.४५ च्या सुमारास आरोपी विशाल आणि त्याच्या १० साथीदारांनी अचानक येऊन शाबीर अन्सारी याला गाठले. त्यानंतर आरोपींनी त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत दगडाने गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी पीडित तरुणाच्या डोक्यावर व छातीवर प्रहार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी फिर्यादीलाही आरोपींनी मारहाण केली. घटनेनंतर सर्व आरोपी तेथून पसार झाले. जखमीला इतर कामगारांनी उपचारासाठी नगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर जहागीर अन्सारी याने ५ मार्च रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज चाला फक्त ७००० पावले

आजच्या धावपळीच्या जीवनात लोक फिटनेसबद्दल बोलतात, पण त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे त्यांना व्यायामासाठी वेळ मिळत नाही. जिममध्ये जाणे, योगा करणे किंवा डाएट प्लॅन फॉलो करणे हे प्रत्येकासाठी शक्य नाही. अशा परिस्थितीत, दररोज ७,००० पावले चालणे हा एक सोपा, प्रभावी आणि वेळ वाचवणारा मार्ग आहे. हे कठीण ध्येय नाही, परंतु त्याचे फायदे इतके खोल आहेत की तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. ही सवय केवळ तुमचा फिटनेस सुधारत नाही तर शरीराच्या आत सुरू असलेल्या अनेक गंभीर समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास देखील मदत करते. हृदयरोग हा आजकालच्या सर्वात सामान्य आणि धोकादायक आजारांपैकी एक आहे. तथापि, दररोज ७,००० पावले चालल्याने तुमचे हृदयाचे स्नायू सक्रिय राहतात, रक्तदाब नियंत्रित राहतो आणि कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित राहते. यामुळे तुमच्या हृदयावर जास्त ताण पडू नये, ज्यामुळे हृदयविकार टाळता येतो.

## पाककला

### डाळींबाची चटणी

**साहित्य :** डाळिंबाचे दाणे १ वाटी, ताजी कोथिंबीर अर्धी वाटी, पुदिन्याची पाने-१०-१२, हिरवी मिरची-२-३, जिरे- १ छोटा चमचा, काळं मीठ-अर्धा चमचा, लिंबाचा रस-१ चमचा, साखर किंवा गूळ- १ चमचा, साधे मीठ- चवीनुसार

**कृती :** सर्वात आधी डाळिंबाचे दाणे काढून घ्या. कोथिंबीर आणि पुदिना स्वच्छ धुवून घ्या. आता मिक्सरच्या भांड्यात डाळिंबाचे दाणे, कोथिंबीर, पुदिना, हिरवी मिरची आणि जिरे एकत्र घ्या. त्यात काळं मीठ, साधे मीठ आणि साखर/गूळ घाला. पाणी न घालता मिक्सरवर प्लस मोडवर जाडसर किंवा गुळगुळीत वाटून घ्या.

चटणी एका बाऊलमध्ये काढून घ्या आणि त्यावर लिंबाचा रस घालून मिक्स करा. तयार चटणी समोसे, ढोकळा, भाता सोबत नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### स्वयंपाकघरा संबंधी

* स्वयंपाकघरात प्रवेशासाठी एकच दिशा असावी आणि एकमेकांसमोर दोन दरवाजे कधीही बांधू नयेत. जर दोन दरवाजे असतील तर उत्तर किंवा पश्चिमाभिमुख एक दरवाजा उघडा ठेवावा आणि दुसरा विरुद्ध दिशेला बंद ठेवावा.

* स्वयंपाकघराचा दरवाजा घड्याळनिहाय दिशेने उघडला पाहिजे जेणेकरून समृद्धी येते. अँटीक्लॉकवाइज दिशेला असलेला दरवाजा संथ प्रगती आणि उशीरा परिणाम घडवून आणतो.

## सौंदर्य

चेहऱ्यावर लिंबू लावल्याने टॅनिंगची समस्या दूर होते. त्याचा वापर करण्यासाठी लिंबाचा रस मधात मिसळून हलक्या हातांनी चेहऱ्याला लावा. सुमारे १५ मिनिटे असेच राहू द्या. नंतर चेहरा कोमट पाण्याने धुवा आणि टॉवेलने स्वच्छ करा.

## सल्ला

हिरवी मिरची जास्त दिवस टिकावी यासाठी त्याची देठं काढून एका डब्यात भरून त्यानंतरच ती फ्रीजमध्ये ठेवावी. त्यामुळे मिरची जास्त दिवस टिकते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ७ मार्च २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, चित्रा ११।१६, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल.

**वृषभ :** जोडीदाराशी वादविवाद टाळा. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल.

**मिथुन :** अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. आरोग्य उत्तम राहील. मान-सन्मानात वाढ होईल.

**कर्क :** कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल.

**सिंह :** एखाद्या मित्राचे प्रशंसनीय सहकार्य मिळेल. आरोग्य उत्तम राहील. काही काळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील.

**कन्या :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण.

**तूळ :** संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस. शत्रू वर्गापासून दूर राहा. आपली योजना बनवण्यात सावधगिरी बाळगा.

**वृश्चिक :** दिवस संमिश्र जाईल. आपल्या क्रोधावर संयम ठेवाल आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळाल.

**धनु :** आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. मागील उधारी वसुल होईल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करेल.

**मकर :** न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील.

**कुंभ :** आपल्या करीयरमधील ध्येयपूर्ती कराल. आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात.

**मीन :** आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वात उत्तम आहे.

## शब्दगंध क्र. ७३८१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | | |
| ९ | | १० | | ■ | ■ | ११ | |
| १२ | | | | ■ | १३ | | ■ |
| ■ | ■ | ■ | ■ | १४ | | | १५ |
| १६ | | १७ | १८ | | ■ | ■ | |
| | ■ | १९ | | ■ | २० | २१ | |
| ■ | २३ | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) 'पार्लमेंट'चे मराठी रूप ३) महादेव; शंकर; नीळकंठ ७) रड रडगाणे ८) नमुना; मासला ९) क्षमा करणारा ११) एक जंगली प्राणी; रानरेडा १२) थोडेसे कडू; निष्ठावान १३) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग १४) एकाच जातीचे १६) गणपती; गणनायक; गणेश १९) पंधरा दिवसांचा समूह; पंधरवडा; पार्टी २०) मुसलमानी धर्मसूत्र २२) रयत; लोक; प्रजा २३) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता

**उभे शब्द :-** १) रक्षण करणारा २) बाजरीचा कडबा ३) नेहमी; हमेशा ४) जळजळ ५) लोकांची मोजणी; जनगणना; खानेसुमारी ६) जंगलाला लागलेली आग; दावानल ८) उफराटा; 'सुलट'च्या विरुद्ध १०) सरहद्द; मर्यादा; सीमा १३) उणे; कमी करणे १४) साल; शक; वर्ष १५) यज्ञ करणारा; मालक; पती; स्वामी १६) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहारा १७) श्मश्रू; हजामत; चमनगोटा १८) सावधगिरी; हुशारी २०) मिठी; आलिंगन २१) वाईट सवय खोड

### शब्दगंध क्र. ७३८० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सां | ग | ली | ■ | उ | फ | रा | टा |
| ज | ■ | ला | प | शी | ■ | ■ | क |
| वा | क | ■ | सा | र | वा | न | ■ |
| त | ड | स | ■ | ■ | न | र | द |
| ■ | व | म | न | का | री | ■ | र |
| खे | ट | र | ■ | क | ■ | सा | द |
| प | ■ | भू | क | ■ | को | क | रू |
| ■ | सा | मी | ल | ■ | प | व | न |

### फिल्मीचक्कर क्र. १२२७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | जा | स | न | म | म | धु | र |
| न | ■ | नी | ■ | धु | ■ | ■ | वि |
| मि | ■ | ■ | तौ | बा | ■ | क | ■ |
| लो | फ | र | ■ | ला | वा | री | स |
| स | ■ | ज | य | ■ | ■ | ब | न |
| ज | वा | नी | ■ | ए | क | ■ | ऑ |
| ना | री | ■ | रा | ■ | स | रा | फ |
| ■ | स | ली | म | ■ | म | जा | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** सुंदर चेहऱ्यावर गर्वाचा मुलामा असतो आणि सुंदर मनाला नम्रतेचे पांघरुण असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### स्वयंपाकघरातील 'धणे' भारतात कुठून आले?

हळद, मीठ आणि मिरपूडसह धणे किंवा पावडरशिवाय भाज्यांची चव अपूर्ण आहे. पण तुम्ही कधी तुमच्या स्वयंपाकघरातील धणे बियांचा इतिहास विचारात घेतला आहे का?

धणे कुठून आले?

धणे प्रामुख्याने भूमध्यसागरीय प्रदेश आणि पश्चिम आशियामध्ये उगम पावले आहे असे मानले जाते. इतिहासकारांचा असा विश्वास आहे की ते इसवी सन पूर्व ५,००० पूर्वीपासून वापरले जात आहे. त्याच्या बिया सुमारे ८,००० वर्षांपूर्वीच्या इस्रायलमधील प्राचीन गुहांमध्ये सापडल्या आहे. तिथून ते हळूहळू इजिप्त, ग्रीस आणि रोममध्ये पसरले. तसेच प्राचीन इजिप्शियन लोक धणे पवित्र मानत होते. पुरातत्व उत्खननात तुतानखामुनसारख्या महान राजांच्या थडग्यांमध्ये आणि पिरॅमिडमध्ये वाळलेल्या धणेच्या बिया सापडल्या आहे. इजिप्शियन लोक त्याला आनंदाचा मसाला म्हणत असत आणि ते मृत्युनंतरच्या जीवनात उपयुक्त असल्याचे मानत होते. ते औषधांमध्ये आणि सुगंधांमध्ये देखील त्याचा वापर करत असत.

धणे भारतात कसे आले?

असे मानले जाते की हा मसाला रेशीम मार्गावरील व्यापाराद्वारे भारतात पोहोचला. भारतीय हवामान धणे लागवडीसाठी इतके अनुकूल ठरले की ते लवकर जमिनीत रुजले.

आयुर्वेदात हजारो वर्षांपासून धणेचा उल्लेख थंडगार औषधी वनस्पती म्हणून केला जातो. आज, भारत हा जगातील धणेचा सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक आहे. धणे हे नाव कसे पडले?

धणेचे वैज्ञानिक नाव Coriandrum Sativum आहे. ते ग्रीक शब्द Koris पासून आले आहे, ज्याचा अर्थ बेडबग आहे. कच्च्या कोथिंबीरच्या पानांचा वास बेडबगसारखा काहीसा तिखट असल्याने त्याला असे नाव देण्यात आले आहे.

## चांगल्या गोष्टी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा गंगेच्या काठावर वसलेल्या एका गावात एक गुरुजी आपल्या शिष्यांसोबत स्नान करत होते.

तेवढ्यात एक वाटसरू आला आणि त्यांना विचारले, महाराज, या गावात कशा प्रकारचे लोक राहतात, खरं तर मला माझ्या सध्याच्या निवासस्थानापासून दुसरीकडे कुठेतरी जायचे आहे?

गुरुजी म्हणाले, तुम्ही आता जिथे राहता तिथे कशा प्रकारचे लोक राहतात?

महाराजांना विचारू नका, तिथे खूप कपटी, दुष्ट आणि वाईट लोक राहतात., वाटसरू म्हणाला. गुरुजी म्हणाले, या गावातही त्याच प्रकारचे लोक राहतात. कपटी, दुष्ट, वाईट... आणि हे ऐकून वाटसरू पुढे गेला.

काही वेळाने दुसरा वाटसरू तिथून गेला. त्याने गुरुजींनाही तोच प्रश्न विचारला, मला एका नवीन ठिकाणी जायचे आहे, या गावात कोणत्या प्रकारचे लोक राहतात ते तुम्ही मला सांगू शकाल का?

तुम्ही जिथे राहता तिथे कशा प्रकारचे लोक राहतात?, गुरुजींनी त्या वाटसरूलाही तोच प्रश्न विचारला.

हो, तिथे खूप सुसंस्कृत, चांगले वागणारे आणि चांगले लोक आहे., वाटसरू म्हणाला.

तुम्हाला इथेही त्याच प्रकारचे लोक सापडतील. सुसंस्कृत, चांगले वागणारे आणि चांगले..., त्याने आपले शब्द पूर्ण केले आणि आपल्या दैनंदिन कामात व्यस्त झाला. पण त्याचे शिष्य हे सर्व पाहत होते आणि वाटसरू निघून जाताच त्यांनी विचारले, माफ करा गुरुजी, पण तुम्ही दोन्ही वाटसरूंना एकाच ठिकाणाबद्दल वेगवेगळ्या गोष्टी का सांगितल्या?

गुरुजी गंभीरपणे म्हणाले, शिष्यांनो, सहसा आपण गोष्टी जशा आहे तशा दिसत नाहीत, तर आपण त्यांना स्वतःसारखे पाहतो. सर्वत्र सर्व प्रकारचे लोक असतात, आपल्याला कोणत्या प्रकारचे लोक पहायचे आहे हे आपल्यावर अवलंबून असते. शिष्यांना गुरूंचे शब्द समजले होते आणि त्यांनी जीवनातील फक्त चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला.

तात्पर्य : नेहमी चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे.

## जीवन का अमृत (भाग १)



के पात्र हैं। सत्गुरु बहुत बेचैन हैं, उन्हें अपने पैरों पर खड़ा हुआ और दृढ़ता से पवित्र रास्ते पर चलता हुआ देखने के लिए, ताकि वे इस रास्ते से मिलने वाली सारी शांति और आनंद का लुत्फ उठाएं और अंत में अपने सच्चे शाश्वत घर पहुँचें । को निर्देश दे सके। वास्तव में शब्द शरीर धारण करता है और हमारे बीच रहता है। सत्गुरु अपने शिष्यों को सदा अपने दिल की गहराईयों में बसा कर रखता है। आखिरकार वे सभी उसके बच्चे हैं। वह उनकी नालायकियों की ओर नहीं देखता । वह उन्हें लायक बनाने आता है। वह उन्हें छोड़ नहीं सकता, उसका प्रेम इतना महान है।

४६. शिष्य सदा सत्गुरु के प्रेममयी संरक्षण में सुरक्षित होता है और उसके भाग्य में दिन-ब-दिन की तरक्की लिखी होती है।

४७. सत्गुरु के निर्देशों के बिना, शब्द से नहीं

### सद्गुरू के निर्देश

जुड़ा जा सकता, पर एक बार हम इससे जुड़ जाएँ, तो यह आत्मा को प्रभु तक ले जाता है, जहाँ से कि शब्द की उत्पत्ति हुई थी और हमारी सारी कोशिशों का पूरा फायदा मिल जाता है।

जब आप अपार सौभाग्य से एक पवित्र इंसान (सत्गुरु) को पा लें तो अपने पूरे मन और आत्मा से उससे जुड़े रहो, क्योंकि आप, जीवन का परम लक्ष्य, अपने आप को जानना और प्रभु को पाना, उसी के द्वारा पा सकते हैं। उसके रंग और जाति की ओर न देखो। उससे आप शब्द का विज्ञान सीखो और पूरी निष्ठा से, शब्द का अभ्यास करो। सत्गुरु शब्द से एकमेक है। शब्द सत्गुरु में है और शब्द शरीर में अवतरित हुआ, ताकि मानवता

४८. सत्गुरु के व्यक्तिगत दायरे में आना वास्तव में एक बड़ी नियामत है। यह शिष्य की अंतर और बाहर, दोनों तरह से मदद करता है। पर सत्गुरु की दया तो सर्वदा बरसती है और शिष्यों तक पहुंचती है, वे कहीं भी हो, कितने भी दूर हों और शिष्य उस दया का उतना आनंद उठाते हैं, जितनी उनकी ग्रहणशीलता हो । अच्छी किताबें पढ़ना, कुछ भी न करने से या गप्पों में समय व्यर्थ करने से बेहतर है। पर जो कुछ भी हम पढ़ें, उसे अपने जीवन का हिस्सा बना लें। ऐसा केवल समर्थ सत्गुरु की दया से ही संभव है, जो कि हमें अंतर में प्रकट प्रभु-सत्ता का प्रत्यक्ष अनुभव दे सकता है।

४९. प्रेम की मूल प्रवृति तब तक प्रकट नहीं हो सकती, जब तक हम प्रियतम को देख नहीं लेते। जब तक हम प्रभु को या उसकी शान को देखने वाले नहीं बनते, तब तक हम प्रभु के अस्तित्व में कोई विश्वास नहीं कर सकते और इसके बिना, सारी प्रार्थनाएं व्यर्थ है। पर गुरु प्रभु की ज्योति का निवास स्थान है, उस ज्योति का प्रसारण केंद्र है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : इतरांविषयी मनात आदरभाव ठेवून, बाह्यतः त्यांच्याशी कठोर वागणं हे माझ्या दृष्टीने योग्य आहे. आपल्या लहानपणी आपल्याला मिळालेली किंवा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमधून मिळालेली ही शिकवण नेहमीच आपल्या बरोबर असते. आता ह्या सवयीत बदल करणं अवघड वाटतं. मी कुठंतरी वाचलं होतं, 'चांगले विचार म्हणजेच चांगली माणसं.'

शिवानीदीदी : हा सुविचारच आपल्या आयुष्याचा मंत्र बनवू या. आपल्या सगळ्यांनाच असं वाटतं की, आपल्याला जगाने स्वीकारावं आणि आपलं कौतुक करावं. पण आपण याकडे फक्त भौतिक दृष्टीने बघतो- जसं, एखादं पद, कपडे, कार आणि एकंदर राहणीमान या दृष्टीने. आपल्याला असं वाटतं की ह्या सगळ्यामुळे आपलं कौतुक होतं, लोक आपल्याला स्वीकारतात आणि आपला मान वाढतो. आत्ताच तुम्ही हा सुंदर विचार मांडलात :

### विचार, शब्द, कर्म

'चांगले विचार म्हणजेच चांगली माणसं.' याचाच अर्थ, आपल्याला चांगली व्यक्ती बनायचं असेल तसंच सगळ्यांकडून प्रेम आणि मान मिळवायचा असेल तर त्यासाठी फक्त एकच मंत्र आहे - 'चांगले विचार अंगीकारा'.

सुरेश ओबेरॉय : चांगले विचार अंगीकारणं खूप अवघड आहे. ध्यान करूनसुद्धा मी पुन्हा पूर्वीप्रमाणे विचार करायला लागतो. माझ्या बरोबर चुकीचं वर्तन केलेल्या माणसाचा फोटो जरी मी कधी बघितला तरी माझ्या मनात राग उफाळून येतो. मला त्याला शिक्षा झालेली बघायची आहे.

शिवानीदीदी : जेव्हा तुम्ही फोटो बघितला तेव्हा तुमच्या मनात रागाचा विचार आला : 'तो माझ्याशी असा वागला होता.' आता हा विचार इथेच थांबणार नाही. : पुढचा विचार माझ्या मनात येतो तो म्हणजे, ईश्वर जर निःपक्षपाती सुरेश ओबेरॉय आहे तर मग माझ्याशी एवढं चुकीचं वागूनही तो मनुष्य आनंदात कसा? शिवानीदीदी : तुम्ही ईश्वरावरही प्रश्न उपस्थित करता?

सुरेश ओबेरॉय : मला त्या माणसाला शिक्षा झालेली पाहायची आहे - असे विचार सतत येत राहतात.

शिवानीदीदी : तुमच्या मनात विचारांची अशी साखळी तयार झाली की, तो माझ्याशी वाईट वागला, कर्माचा सिद्धान्त जर खरा असेल तर त्यालासुद्धा त्रास झाला पाहिजे... वगैरे. आपल्यातील अनेक जण दिवसभर असाच विचार करत राहतात. असे विचार त्याच्यासारख्याच असंख्य विचारांची निर्मिती करतात ज्यामुळे नकारात्मक भावना निर्माण होतात.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक ट्रक आणि पोपट यांची धडक होते, पोपट बेशुद्ध पडतो.
ट्रक ड्रायव्हर पोपटाला घरी पिंजऱ्यात ठेवतो...
(पोपट शुद्धीवर आल्यावर) आयला जेल?? ड्रायव्हर मेला की काय??

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* नवीदिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन कोणाच्या हस्ते झाले? - नरेंद्र मोदी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### केळी

केळफुलामुळे गर्भाशयाच्या तक्रारी दूर करता येतात. कारण केळफुलाच्या सेवनाने शरीरातील अंत:स्रावाचे (Harmones) प्रमाण संतुलित करता येते. यामुळे मासिक पाळीत अति रक्तस्राव होत असेल, तर केळफुलाची भाजी खाणे उपयुक्त ठरते.

केळफुलामुळे प्रोजेस्टेरॉन या हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राहते व यामुळे मासिक पाळीमध्ये होणाऱ्या वेदना केळफुलाच्या सेवनाने कमी होतात.

केळामध्ये पोटॅशिअम जास्त प्रमाणात असल्यामुळे त्याचा अति रक्तदाब काबूत ठेवायला मदत होते.

सावधानता :

केळी सहसा एकदम सकाळी व रात्रीच्या वेळी खाऊ नयेत. कारण यामुळे कफ होण्याची शक्यता असते. तसेच सर्दी, खोकला झालेला असताना केळी खाऊ नयेत.

आयुर्वेदानुसार दूध आणि केळी एकत्र करून केलेले शिकरण व फ्रुट सॅलड खाऊ नये. कारण केळ व दूध एकत्र खाणे हा विरुद्ध आहार आहे. असे वारंवार खाल्ल्याने अनेक आजारांची लागण होऊ शकते. त्याऐवजी केळ व साजूक तूप हे मिश्रण खावे, तसेच कफप्रवृतीच्या व्यक्तींनी केळ खाऊ नये.

बाजारातून केळी आणताना ती नैसर्गिकरीत्या पिकलेली आहेत की नाही ते पाहावे. सहसा एकदम हिरव्या दांड्याची आणि दिसायला पिवळीधमक सोनेरी केळी ही इथिलिन सोल्युशनमध्ये बुडवून किंवा कॅल्शिअम कार्बाईड ही रासायनिक पावडर टाकून कृत्रिमरीत्या पिकविलेली असतात. ही केळी दिसायला जरी सुंदर असली, तरी आरोग्यास अहितकारक असतात. कृत्रिमरीत्या पिकविलेले केळ हे सोलल्यानंतर त्याची साल ही अपरिपक्व असल्याने चटकन तुटते. सालाच्या आतून असलेल्या धाग्यासारख्या पांढऱ्या भागाचे लगेचच तुकडे पडतात. म्हणून केळी खरेदी करताना पिवळ्या दांड्याची आणि केळ्यावर थोडी काळी ठिपके पिडलेली केळी घ्यावीत. ही केळी नैसर्गिकरीत्या पिकविलेली असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘अनाहत एक कलासृष्टी’ आयोजित शास्त्रीय, सुगम गायन आणि ‘स्वतंत्र तबला वादन राज्यस्तरीय संगीत स्पर्धेचे’ निकाल जाहीर

**अनाहतच्या संगीत रत्न या राज्यस्तरीय स्पर्धेतून मोठे कलाकार निर्माण होतील : उद्योजक नरेंद्र फिरोदिया**



अनाहत एक कलासृष्टीच्या वतीने आयोजित शास्त्रीय, सुगम गायन आणि स्वतंत्र तबला वादन राज्यस्तरीय संगीत स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आला.

नगर – शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन, आय लव्ह नगर प्रायोजित अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या वतीने शास्त्रीय गायन, सुगम गायन आणि स्वतंत्र तबला वादन या राज्यस्तरीय संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्पर्धेची अंतिम फेरी, शास्त्रीय गायन मैफल व पारितोषिक वितरण समारंभ नुकताच हॉटेल मेरीलँड येथे पार पडला. राज्यभरातून प्राथमिक फेरीसाठी जवळपास ३०० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्यातील १५० स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली होती. स्पर्धेचे उदघाट्न विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये डॉ. ऋचा तांदूळवाडकर, सौ.आसावरी नातू, न्यायाधीश चारुशीला डोंगरे, दीप्ती करंदीकर, सौ.अनुजा कुलकर्णी, सौ. राधिका सुवर्णपाठकी, सौ. रोशनी त्रंबके यांचा समावेश होता. १ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून स्पर्धेला प्रारंभ झाला आणि सायं. ६ वाजता The Disciple या Web series मधील अभिनेते, शास्त्रीय गायक आदित्य मोडक यांची शास्त्रीय गायन मैफल आणि बक्षीस वितरण समारंभ उद्योजक नरेंद्र फिरोदिया, डॉ. नीरज करंदीकर, अशोकजी गांधी, विलास बडवे, चंद्रकांत पंडित, धनेश बोगावत, अविनाश देऊळगावकर, किशोर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. शास्त्रीय गायक आदित्य मोडक यांनी राग – कामोद आणि मालकंस अत्यंत तयारीने सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. या भवनातील गीत पुराणे या नाट्यगीताने मैफलीची सांगता केली. त्यांना संवादिनीवर संकेत सुवर्णपाठकी व तबल्यावर प्रसाद सुवर्णपाठकी, तानपुऱ्यावर राधिका पाठक यांनी समर्पक साथसंगत केली.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – शास्त्रीय गायन – प्रथम क्रमांक – सरोज पालडिया, द्वितीय क्रमांक – युगंधरा केचे, तृतीय क्रमांक – गौरी गंगाजळीवाले, उत्तेजनार्थ – मयुरी लेले, अवधूत कुलकर्णी

स्वतंत्र तबला वादन – प्रथम क्रमांक – श्रेयश भोईर, द्वितीय क्रमांक – जय गांधी, तृतीय क्रमांक – आदित्य मराठे, उत्तेजनार्थ – संजीत उंडे, प्रतिक गळसोडे

सुगम गायन लहान गट – प्रथम क्रमांक – स्वरा किंबहुने, दुर्वा संन्यासी, द्वितीय क्रमांक – नील चापेकर, देव मुळे, तृतीय क्रमांक – शरण्या केंगार, स्वरा देऊळगावकर, उत्तेजनार्थ – भावेश खोसे, हरिप्रिया घायाळ, मुलांशू परदेशी, स्वराली जाधव

सुगम गायन मोठा गट – प्रथम क्रमांक – सरोज पालडिया, द्वितीय क्रमांक – अभिरूपा पैंजणे, तृतीय क्रमांक – रूपक कुलकर्णी व पूनम मापारी, उत्तेजनार्थ – अबोली झोळगीकर, आश्लेषा मोरे व अनुष्का शहाणे

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पवन श्रीकांत नाईक, अविनाश शिरापुरी, संदीप कुलकर्णी, स्पर्धा प्रमुख आनंद कुलकर्णी, स्पर्धा समन्वयक श्रेया सुवर्णपाठकी, ओंकार देऊळगावकर, अनिकेत देऊळगावकर, किरण डिडवाणिया, रश्मी गंधे, अमृता बेडेकर, ऋतुजा पाठक, मोहिनी खोल्लम, संतोष खोल्लम, महेश कुलकर्णी, अंकित पवार, गीतांजली सगम, गायत्री धनलगडे, शार्दूल खोल्लम, सर्वेश खोल्लम, अनिकेत गोसावी, श्रद्धा देऊळगावकर, प्रचिती सुवर्णपाठकी, देवेन कुलकर्णी, अमित डोंगरे यांनी परिश्रम घेतले. तसेच सर्व स्पर्धकांना अहिल्यानगरच्या हर्षद भावे, शेखर दरवडे, गणेश बैरागी, सौरभ साठे, धनंजय गोहेर, प्रशांत थोरात, सार्थक डावरे, कल्याण मुरकुटे, नेहा दरवडे यांनी वाद्य साथसंगत केली. या कार्यक्रमासाठी न्यायाधीश विनोद डोंगरे, ज्येष्ठ संगीतज्ञ लक्ष्मणराव डहाळे, श्रीराम तांबोळी, ज्ञानेश कुलकर्णी, अंगद गायकवाड, अंजली व नंदिनी गायकवाड, प्रसाद शेटे, महेश खोपटीकर, संगीता देऊळगावकर, अनघा पछाडे आदी व पालक उपस्थित होते.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर व माणिक देव यांनी केले. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. निलांबरी कोर्टीकर, डॉ. सारिका पांडे, प्रशांत गाजरे, सुजित काळे, चंदल आडगावकर, पूजा कुलकर्णी, डॉ. नीरज करंदीकर आणि आदित्य मोडक यांनी केले. ध्वनी व्यवस्था अवधूत गुरव यांची होती.

# प्रेरणादायी अक्षरधन

## नाटक पंचमवेद

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
‘चपराक’ प्रकाशित ललित चिंतन

नाटक आणि रंगभूमी हे सुसंस्कृत समाजरचनेचे आणि लोकजीवनाचे प्रतीक आहे. लोकजीवनातील वास्तवात जे घडते ते रंगमंचावर पुन्हा अनुभवायला मिळते आणि आपल्या वास्तवाचे खरे ज्ञान होते. हे नाटकाचे प्रयोजन ठरते. वास्तवात असणारे सत्य आणि वास्तवात असणारे असत्यही सत्यपणे रंगमंचावर मांडणे हे नाटकाचे कार्य. जगातील सर्वोत्कृष्ट नाटक कोणते की जे जीवनाच्या वास्तवाला अधिकांश रूपाने रंगमंचावर उभे करते ?

रंगमंच हा भासमान आहे आणि जीवनाचे वास्तव हे सत्य आहे पण भासमान रंगमंचावर जीवनाचे वास्तव उभे करणे हेच सत्य आहे, अशी भूमिका घेऊन उभे राहिलेले दर्शन म्हणजे नाटक होय. नाटकाची व्याख्या सांगतानाच म्हटले आहे की ’त्रैलोक्यस्यास्य सर्वस्य नाट्यं भावानुकीर्तनम्।’

या सर्व त्रैलोक्याच्या भावभावनांचे अनुकीर्तन अर्थात अनुकरणात्मक प्रकटीकरण म्हणजे नाट्य होय. नाटक आणि नाट्यशास्त्र म्हटले की डोळ्यासमोर उभे राहतात ते भरतमुनी. नाट्यशास्त्राचा उगम कसा झाला आणि नाटकाचा पहिला प्रयोग केव्हा झाला याविषयी स्वतः भरतमुनीने एक सुंदर कथा सांगितली आहे. त्रेतायुग सुरू झाले होते. लोकांत रजोगुण वाढत चालला होता. त्यामुळे विषय, वासना, क्रोध, लोभ वाढत जाऊन सुखदुःखाचे हेलकावे बसत होते. यावेळी इंद्रादि देव ब्रह्मदेवाकडे गेले आणि म्हणाले, ’आता चिंतनाच्या अंगाने विचार करण्याची दृष्टी मावळत चालली आहे. म्हणून आम्हाला प्रबोधन करणारे; पण दृश्य आणि श्राव्य असे एखादे करमणुकीचे साधन हवे आहे. वेद हे ज्ञान देतात पण ते ज्ञान केवळ त्रैवर्णिकांसाठीच उपलब्ध होते. म्हणून स्त्री–शूद्रांनाही अधिकार प्राप्त होईल असा एखादा वेद तुम्ही आम्हाला निर्माण करून द्या.’

त्यावर ब्रह्मदेव हसले. त्यांनी विनंती मान्य केली आणि म्हणाले, ’हा वेद खरोखरी जनलोकातच आहे. तरीही मी तुमच्यासाठी तो देतो.’

ब्रह्मदेवाने ऋग्वेदातून पाठ्य म्हणजे पात्रांनी बोलायचे संवाद घेतले. सामवेदातून गीत घेतले. यजुर्वेदातून अभिनय घेतला. अथर्ववेदातून रस घेतला आणि अशाप्रकारे चारही वेदातून नाट्यवेद नावाचा पाचवा वेद निर्माण केला. नाटकाला पंचमवेद का म्हणतात हे यावरून लक्षात येते. हा वेद सर्व लोकांच्या आचार विचारांचा दर्शक, सर्वशास्त्रसंपन्न सर्वकलासंपन्न आणि जगतव्यवहार समावेशक ठरला आणि हा नाट्यवेद निर्माण झाल्यावर तद्नुसार एका नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग करण्याचे काम ब्रह्मदेवाने भरतमुनीकडे सोपविले. आपल्या शंभर पुत्रांसह भव्य रंगमंच उभारून त्यांना सहभागी करून भरताने इंद्रध्वज उत्सवाच्या वेळी पहिला प्रयोग केला आणि हा रसिकांच्या हाती आला. तिथून पुढे उत्सव, यात्रा अशा प्रसंगी नाटके सादर करण्याची परंपरा निर्माण झाली. ती परंपरा आजच्या लोकरंग–भूमीपर्यंत येऊन ठेपली आहे. **– किशोर गांधी**

# महिला दिनानिमित्त लष्करी अधिकारी पत्नींचा कोहिनूर मॉल येथे ८ मार्चला ‘सन्मान सोहळा’

नगर – अहिल्यानगर परिसरात अनेक लष्करी केंद्र आहेत. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या अधिकारी, जवान यांचे कुटुंबीय नगरमध्ये वास्तव्यास आहेत.

जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता कोहिनूर मॉल येथे लष्करी अधिकाऱ्यांच्या पत्नींचा सन्मान करून महिला दिन साजरा केला जाणार आहे. यावेळी लष्करी अधिकाऱ्यांच्या पत्नींशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेण्याची इच्छा संधी इतर महिलांना मिळणार आहे.

देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी नियुक्त भारतीय जवान, अधिकारी कुटुंबापासून दूर असतात. सीमेवर सतत मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी घरातील सदस्यही काळजीतच असतात. या परिस्थितीत अधिकाऱ्यांच्या पत्नी खंबीरपणे कुटुंब सांभाळतात. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतात. सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडतात. आपले पती देशाची सेवा करत आहेत याचा त्यांना अभिमान असतो. अशाच प्रकारे महिलांचे भावविश्व या कार्यक्रमातून उलगडणार आहे. कोहिनूर मॉलच्या श्वेता गांधी यांच्या संकल्पनेतून अतिशय वेगळ्या पद्धतीने हा महिला दिन साजरा होणार आहे.

नगरकरांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्वस्तिक हॉस्पिटल्सतर्फे १२ मार्चपर्यंत मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया



स्वस्तिक हॉस्पिटल्सतर्फे १२ मार्च पर्यंत मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर झाले.

नगर – होळीच्या निमित्ताने गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांच्या आयुष्यात आशेचे रंग भरण्याच्या उद्देशाने स्वस्तिक हॉस्पिटल्स, प्लॉट क्र. ५, राजपाल समोर, इंदु पॅव्हेलियन कॉम्प्लेक्समागे, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर येथे ५ ते १२ मार्च या दरम्यान मोफत मोतीबिंदू (Cataract) शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये मोफत नेत्रतपासणी तसेच फॅको (Phaco) पद्धतीने आधुनिक यंत्रसामग्रीद्वारे सुरक्षित मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ही शस्त्रक्रिया विना टाके, विना इंजेक्शन व विना पट्टी करण्यात येणार असून अनुभवी तज्ज्ञ नेत्ररोग विशेषज्ञांची सेवा रुग्णांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

डॉ. प्रफुल्ल चौधरी म्हणाले, समाजातील गरजू रुग्णांना आधुनिक आणि सुरक्षित नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. याचा लाभ घ्यावा.

शिबिराला रुग्णांचा प्रतिसाद मिळत आहे. नावनोंदणी करून आपले स्थान निश्चित करावे. अधिक माहितीसाठी ९२४४१०८१०८ / ८८६२०२७७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; जीनियस ग्लोबल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात, चिमुकल्यांच्या नृत्य–गीतांच्या बहारदार सादरीकरणाने पालक मंत्रमुग्ध**



जीनियस ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे दीपप्रज्वलनाने शुभारंभ करताना महापौर सौ. ज्योतिताई गाडे आदी.

नगर – सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करताना सांगितले. शहरातील शैक्षणिक संस्थांनी अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

भिस्तबाग, कजबे मळा येथील जीनियस ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात व जल्लोषात पार पडले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, देशभक्तीपर गीते, समूह नृत्य, अभिनय आणि विविध कलागुणांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका सौ. शारदाताई ढवण, जीनियस ग्लोबल स्कूलचे अध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, इंजिनिअर डी. आर. शेंडगे, सेक्रेटरी पूजाताई कजबे, उपाध्यक्ष सानप, खजिनदार पांडुरंग गवळी, बाळासाहेब कजबे, राहुल कजबे, अश्विनी शेंडगे, उषा शेंडगे, शांताराम कजबे, सहसंचालक जगदीश देशमुख तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी आणि शहरातील विविध प्री–प्रायमरी स्कूलचे संचालक उपस्थित होते.

संस्थेचे सहसंचालक महेंद्र म्हसे यांनी स्वागत करून प्रास्ताविकात संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने शिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे तर क्रीडा, कला, संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास यावरही विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे सहसंचालक जगदीश देशमुख यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने व क्रीडा शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण दिले जात असल्याची माहिती दिली. महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करताना अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. शहरातील शैक्षणिक संस्थांनी अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शेंडगे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेताना गुणवत्तापूर्ण व परवडणाऱ्या शिक्षणाची परंपरा कायम ठेवण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे सांगितले. ग्रामीण व शहर परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत दर्जेदार शिक्षण देण्याचे ध्येय संस्थेने ठेवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरसेविका शारदाताई ढवण यांनी परिसरातील या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये माफक दरात दिल्या जाणाऱ्या दर्जेदार शिक्षणाचे तसेच विविध उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शाळेचे कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन ज्योती म्हसे व समृद्धी डोमकावळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका उषा मसुरे, योगिता दातीर व पूजा सोळसे यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करुन पालक आणि शिक्षकांच्या उपस्थितीत आत्मविश्वासाने रंगमंच गाजवला.



उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर स्नेहबंध फाउंडेशनतर्फे विविध सार्वजनिक ठिकाणी पक्ष्यांसाठी दाणा व पाण्याची व्यवस्था करताना संस्थापक डॉ. उद्धव शिंदे व मान्यवर.

# ‘स्नेहबंध’ने केली पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची व्यवस्था

नगर – शहरात वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची व अन्नाची तीव्र कमतरता जाणवत आहे. याची दखल घेत स्नेहबंध सोशल फाउंडेशन तर्फे शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी पक्ष्यांसाठी दाणा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या पुढाकारातून अहिल्यानगर आकाशवाणी, जिल्हा अधिकारी कृषी अधिकारी कार्यालय, केशवराव गाडीलकर हायस्कूल, माणिकताई करंदीकर हायस्कूल, लोकमान्य टिळक शाळा, जानकीबाई मूकबधिर विद्यालय, शिव–गणेश मंदिर, रासनेनगर परिसरात मातीच्या भांड्यांमध्ये पाण्याची व धान्याची सोय करण्यात आली.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, उन्हाच्या झळांमुळे पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पक्ष्यांचे जतन करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरासमोर, गच्चीवर किंवा परिसरात पाण्याचे भांडे व दाण्याची व्यवस्था करावी.

या उपक्रमात आकाशवाणी कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे, अभियांत्रिकी प्रमुख श्रीमती मानसी गारुडकर, ॲड अजित वाडेकर, सचिव नामदेवराव गाडीलकर, मुख्या.अनिल गायकवाड, मुख्या.अनिल सुद्रिक, शिक्षक अभय ठाणगे, गणेश वालझडे तसेच शाळांचे पदाधिकारी, शिक्षकवृंद तसेच कर्मचारी उपस्थित होते.

स्नेहबंध फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमामुळे शहरात पर्यावरण जनजागृतीला चालना मिळत असून नागरिकांनीही या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले.



भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन यांच्यावतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार येथील महर्षी ग.ज.चितांबर विद्यामंदिरच्या मा.प्राचार्य सौ. विभावरी रोकडे यांना प्रदान करण्यात आला.

# राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्काराने सौ. विभावरी रोकडे सन्मानित

नगर – भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन यांच्यावतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार येथील महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर च्या मा. प्राचार्य सौ. विभावरी रोकडे यांना प्रदान करण्यात आला.

हा सोहळा नाशिक येथे झाला. साहित्यिक, विचारवंत उत्तम कांबळे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी उत्तम कांबळे मनोगतात म्हणाले विभावरी रोकडे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात निस्वार्थ भावनेने काम केले. त्यांचे कार्य उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. अनेक विद्यार्थ्यांना दिशा व प्रेरणा मिळाली. त्यांच्या या मोलाच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. त्याचबरोबर उत्तम कांबळे म्हणाले ग्राहक संघटनांना विधान परिषद व संसदेत प्रतिनिधित्व मिळावे अशी मागणी त्यांनी केली. ग्राहक संरक्षण कायदा हा प्रत्येकासाठी असून ग्राहकांची ताकद मोठी आहे. सर्वांनी कायद्याचा योग्य वापर करावा. असे ते म्हणाले.

दुर्गाताई तांबे यांनी ग्राहकांना जागृत राहण्याचे आवाहन केले.

यावेळी उत्तम कांबळे, दुर्गाताई तांबे, शिक्षणाधिकारी नेहा शिरोळे, सहाय्यक आयुक्त मनीष सानप, ग्राहक संरक्षण समितीचे चेअरमन दादाभाऊ केदारे, सचिव डॉ. अविनाश झोटिंग, डॉ. अर्चना, डॉ. माया पठाडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# जिंदगी का सफर.. सबकुछ किशोर कुमार



गायक किशोर कुमार गांगुली यांच्या सिने कारकिर्दीवर तृकश्राव्य कार्यक्रम रजनीभाई मेहता यांनी सादर केला. याप्रसंगी नंदकुमार आढाव आदी.

नगर – अभिनेता (कॉमेडियन) गायक, संगीतकार, गीतकार, दिग्दर्शक व निर्माता बहुआयामी व्यक्तिमत्व असलेला एकमेव किशोर कुमार गांगुली यांच्या सिने कारकिर्दीवर तृकश्राव्य कार्यक्रम रजनीभाई मेहता मुंबई, स्वीट होम हॉल येथे सादर केला. रजनीभाई मेहता लेखक असून संगीतकार कल्याणजी आनंदजीं यांच्यावरील गुजराती भाषेतील पुस्तकाचे प्रकाशन २०२५ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. आज पर्यंत मुंबईत सिनेमा विषयावर १२६ कार्यक्रम सादर केले असून त्यांच्या कार्यक्रमाला संगीतकार नौशाद, खय्याम, ओ पी नय्यर, सिने कलावंत विश्वजीत, आशा पारेख याशिवाय गायक जगजीत सिंह, रूपसिंह राठोड, पंकज उदास आदींनी हजेरी लावली.

प्रास्ताविक करताना आयोजक धनेष बोगावत यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रजनीभाईचा परिचय श्रोत्यांना सांगत करून दिला. किशोर कुमार यांचे बालपण खंडवा ते मुंबई येथील फिल्मी जगात संगीतकार खेमचंद प्रकाशनी जिद्दी चित्रपटात प्रथम पार्श्वगायनाची संधी दिली, देवआनंद साठी एस डी बर्मन यांनी किशोरच्या आवाजाचा अनेक चित्रपटात केलेला योग्य वापर. अभिनेते अशोक कुमार, देव आनंद, राजेश खन्ना, प्राण, लता मंगेशकर, आशा भोसले, आर डी बर्मन, कल्याणजी आनंदजी इत्यादी सिने कलावंतांची किशोर कुमार बद्दलची मनोगते, याशिवाय किशोरची लोकप्रिय गाणी, चित्रपटातील विनोदी सीन आणि बॉलीवूड मधील यशस्वी कारकीर्द अनवट जीवनपट पडद्यावर दाखवताना रजनीभाईनी आपल्या खुमासदार शैलीत किशोरचे अनोखे चित्रपटातील, कौटुंबिक किस्से सांगत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विशेष आपला लाडका गायक, अभिनेता किशोरची अखेरची मुंबई ते खंडवा निर्वाण यात्रा पडद्यावर पाहताना प्रेक्षकांची मन हे लावून गेली.

हमारी याद आयेगी ग्रुप तर्फे रजनी भाईंचा सत्कार करताना नंदकिशोर आढाव म्हणाले सुहास किर्लोस्कर, जफर आबीद, पद्माकर पाठक, उस्मान शेख, कृपाशंकर शर्मांची सिनेमा विषयावर दृकश्राव्य नगरमध्ये कार्यक्रम सादर केले असून लवकरच सुलभा तेरणीकरांचा कार्यक्रम सादर करणार आहोत. धनेश बोगावत यांनी सादर केलेले संगीतावरील प्रत्येक कार्यक्रम हा नाविन्यपूर्ण होता, असेच कार्यक्रम भविष्यात सादर करावेत असे आभार मानताना दिलीप अकोलकरांनी सांगितले. किशोर कुलकर्णी यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.


कार्यक्रमास विलास बडवे, अजय दगडे, राजेंद्र निंबाळकर, पतंगे, दादू शिंदे, पवन नाईक, पाठक, शैलेंद्र गांधी, राजीव गुजर, प्रसाद शेटे, पटवर्धन, चंद्रकांत पंडित, मिलिंद कोलते, येवलेकर, श्रीमती सुजाता काळे, सौ. शिंदे आदी उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## राजाच्या कबरीत परलोकातील सेवकांचे पुतळे

इजिप्तमधील पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी एक महत्त्वपूर्ण शोध लावला आहे. त्यांना एका दुसऱ्या फेरो (राजा) च्या कबरीमध्ये, फेरो शोशेंक तृतीयचे असलेले २२५ 'शब्टी' पुतळे सापडले आहेत. शब्टी हे असे पुतळे होते, जे प्राचीन इजिप्शियन लोक मृतांसाठी परलोकात सेवक म्हणून काम करतील, असे मानत असत. हे पुतळे उत्तर इजिप्तमधील




तनीस नावाच्या ठिकाणी सापडले. ते फेरो ओर्सोकोन दुसरा याच्या कबरीच्या उत्तर चेंबरमध्ये, एका अज्ञात शवपेटीजवळ आढळले. शब्टी पुतळ्यांवरील चित्रलिपी वाचून हे पुतळे शोशेंक तृतीयचे असल्याचे निश्चित झाले. इजिप्शियन पर्यटन आणि पुरातन वास्तू मंत्रालयाने अनुवादित केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ओर्सोकोन दुसरा याची कबर आणि शवपेटी १९३९ मध्येच सापडली होती; परंतु हे शब्टी पुतळे नुकतेच इजिप्शियन-फ्रेंच टीमने संवर्धन कार्यादरम्यान शोधून काढले आहेत. या टीमला काही नवीन शिलालेख देखील सापडले आहेत, ज्यांचे ते वाचन आणि विश्लेषण करत आहेत. प्राचीन इजिप्शियन लोकांचा असा विश्वास होता की शब्टी (ज्याला 'उशाब्टी' असेही म्हणतात) पुतळे परलोकात मृतांसाठी काम करतील. ते शेतीची कामे करणे, मृतांसाठी वस्तू आणणे यांसारखी अनेक कार्ये करत असत.

श्रीमंत आणि शक्तिशाली लोकांना त्यांच्यासोबत शेकडो शब्टी पुतळे पुरले जात असत. उदाहरणार्थ, तुतानखामेनच्या कबरीत ४०० हून अधिक शब्टी सापडले आहेत. शोशेंक तृतीय (किंवा शेर्शोक तृतीय) यांनी सुमारे इ.स.पूर्व ८२५ ते ७७३ पर्यंत राज्य केले, तो काळ असा होता जेव्हा इजिप्त एकसंध नव्हते. तनीस येथील फ्रेंच पुरातत्त्व मिशनचे संचालक आणि ज्यांच्या टीमला हे पुतळे सापडले, ते फेडेरिक पेराडो यांनी सांगितले की, 'शोशेंक तृतीयची राजवट लांब पण कठीण होती. त्यांच्या आणि दक्षिणेकडील दोन राजांमध्ये (त्यांचे चुलत भाऊ) रक्तरंजित राजघराण्यातील युद्ध झाले. 'या संघर्षानंतरही, शोशेंक तृतीय यांनी तनीसमध्ये 'अनेक स्मारके, विशेषतः मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वारावर एक मोठे द्वार' बांधले, असे पेराडो यांनी सांगितले. या फेरोने तनीसमध्ये स्वतःसाठी कबरही बांधली, जिथे ओर्सोकोन दुसरा (ज्याने सुमारे इ.स.पूर्व ८७४ ते ८५० पर्यंत राज्य केले) याला आधीच पुरले गेले होते. ओर्सोकोन दुसरा आणि शोशेंक तिसरा हे दोघेही इजिप्तच्या २२ व्या राजघराण्यातील होते. फायन्स (चकचकीत मातीची भांडी) पासून बनवलेले हे शब्टी पुतळे ओर्सोकोन दुसरा याच्या कबरीत सापडल्यामुळे हे स्पष्ट होते की शोशेंक तिसरा याला त्याच्या स्वतःच्या कबरीत नव्हे, तर ओर्सोकोन दुसरा याच्या कबरीतील एका अज्ञात शवपेटीत पुरण्यात आले होते. या कबरीबद्दल संशोधकांना बऱ्याच काळापासून माहिती होती; परंतु शोशेंक तिसरा याला येथे पुरण्यात आले होते, हे त्यांना माहिती नव्हते.

## कृत्रिम बुद्धीमत्ता बनणार मानवी बुद्धीमत्तेसम!

सध्याचे 'एआय' हे 'आर्टिफिशियल नॅरो इंटेलिजन्स' (एएनआय) म्हणजेच मानवी बुद्धिमत्तेपेक्षा कमी दर्जाचे आहे. भविष्यात ते 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स' (एजीआय) म्हणजेच मानवी बुद्धिमत्तेच्या तोडीचे होऊ शकेल असे अनेकांना वाटते. त्याहीपेक्षा पुढे जाऊन ते 'आर्टिफिशियल सुपर इंटेलिजन्स' (एएसआय) म्हणजे मानवी बुद्धिमत्तेपेक्षा सरस होईल, असेही काहींना वाटते. आता जागतिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर वाढत असताना, मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नाडेला यांनी 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स' (एजीआय) बद्दल एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. द्वारकेश पटेल आणि 'सेमीॲनालिसिस' चे संस्थापक डायलन पटेल यांच्यासोबतच्या एका मुलाखतीत नाडेला यांनी 'एजीआय'च्या प्रारंभिक टप्प्यात असल्याचे मान्य केले आणि भविष्याबद्दल आपला उत्साह व्यक्त केला.



नाडेला म्हणाले, 'ही कदाचित औद्योगिक क्रांतीनंतरची सर्वात मोठी गोष्ट असू शकते,' आणि या उत्साहातूनच त्यांनी आपल्या संभाषणाला सुरुवात केली. त्यांचे मत आहे की, 'आम्ही काही खूप उपयुक्त गोष्टी बनवल्या आहेत आणि मला आशा आहे की हा बदल अत्यंत परिवर्तनकारी ठरेल.' आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स (एजीआय) हा असा एआय आहे जो कोणत्याही बौद्धिक कार्याला अगदी माणसाप्रमाणेच स्वतः समजून, शिकून पूर्ण करू शकतो. यामध्ये पुढील क्षमतांचा समावेश असतो: कॉमन सेन्स (सामान्य ज्ञान), तर्कशक्ती (Reasoning) आणि निर्णय घेण्याची क्षमता( Decision Making). ही वैशिष्ट्ये 'एजीआय'ला सध्याच्या केवळ विशिष्ट कार्यांसाठी (उदा. भाषा, इमेज, कोडिंग) असलेल्या एआयपेक्षा वेगळे ठरवतात.

एजीआयमध्ये प्रत्येक प्रकारचे कार्य करण्याची क्षमता असते आणि ते अनुभवाने शिकणाऱ्या माणसाप्रमाणे काळानुसार स्वतःला सुधारत राहते. एजीआयमुळे आरोग्य, शिक्षण, उद्योग आणि संशोधन अशा क्षेत्रांमध्ये मोठे बदल होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे जगाचा संपूर्ण ढाचा बदलू शकतो. नाडेला यांच्या मते, खरा प्रश्न एजीआयची माणसांसाठी उपयुक्तता हा आहे. म्हणजेच, एजीआय माणसांसाठी कोणती कामे करू शकेल, हे पाहणे महत्त्वाचे आहे. ते म्हणाले की, जर एजीआय योग्य प्रकारे विकसित झाले, तर ते माणसांची विचार करण्याची आणि कार्य करण्याची क्षमता वाढवणारे एक शक्तिशाली साधन बनू शकते.


## किटकनाशकांचा शुक्राणूंवर मारा

शेतीत वापरल्या जाणाऱ्या 'निओनिकोटिनॉइडस्' नावाच्या कीटकनाशकामुळे पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या आणि गुणवत्ता वेगाने कमी होत असल्याचे नवीन अभ्यासातून समोर आले आहे. प्रयोगशाळेतील नर उंदरांवर केलेल्या चाचण्यांमध्ये या रसायनांमुळे स्पर्म काऊंट, त्यांची हालचाल आणि रचना खराब झाल्याचे आढळले. मानवांवरही असाच परिणाम होण्याची शक्यता खूप जास्त असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.



'एन्व्हायर्नमेंटल रिसर्च' जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या पुनरावलोकनात २००५ ते २०२५ या कालावधीतील २१ प्रयोगांचा अभ्यास केला. यात निओनिकोटिनॉइडस्च्या संपर्कात आलेल्या प्राण्यांमध्ये वृषणांचे ऊतक (टेस्टिक्युलर टिश्यू) खराब झाले, हार्मोन्सचा तोल बिघडला आणि शुक्राणूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले, असे शास्त्रज्ञांना दिसून आले. ही कीटकनाशके झाडाच्या मुळापासून पानापर्यंत पूर्णपणे शोषली जातात. त्यामुळे फळे-भाज्या कितीही धुतल्या तरी त्यांचे अवशेष राहतात. ५० टक्क्यांहून अधिक लोकांच्या शरीरात आणि मुलांमध्ये तर आणखी जास्त प्रमाणात या रसायनांचे कण सापडले, असे अमेरिकेतील सर्वेक्षणात आढळले.

म्हणजे आपण रोज जे खातो त्यातून हे विषारी पदार्थ आपल्या शरीरात जातात, असा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी काढला. ऑक्सिडेटिव्ह तणाव वाढून शुक्राणूंच्या पेशी आणि त्यांचे डीएनए खराब होते. पुरुष हार्मोन्सचे सिग्नलिंग बिघडते आणि वृषणांचे ऊतक नष्ट होतात, असा निष्कर्ष संशोधनातून निघाला. परिणामी, स्पर्म काऊंट आणि त्यांची गतिशीलता कमी होते, प्रजनन क्षमता घटते, असे यात पुढे म्हटले आहे. 'हे संशोधन फक्त प्राण्यांपुरते मर्यादित नाही. सर्व सस्तन प्राण्यांमध्ये शुक्राणू बनण्याची प्रक्रिया सारखीच असल्याने मानवांवरही हा धोका आहे, अन्नातील कीटकनाशकांचे अवशेष हळूहळू पुरुषांची प्रजनन शक्ती कमी करत आहेत,' असे प्रमुख संशोधिका सुमैया इरफान आणि वेरोनिका सांचेझ यांनी सांगितले. त्यामुळे आता कीटकनाशकांचा वापर कमी करणे आणि सेंद्रिय शेतीकडे वळणे यांची गरज अधोरेखित झाली आहे.



## मंगळावरचा सर्वात मोठा ज्वालामुखी

ग्रहांच्या दुनियेत मंगळ ग्रहाला जाणून घेण्याची उत्सुकता शास्त्रज्ञांमध्ये खूप पूर्वीपासून आहे. या शेजारच्या लाल ग्रहाची रहस्ये उलगडण्यासाठी वैज्ञानिक अनेक वर्षांपासून संशोधन करत आहेत. या दरम्यान, मंगळ ग्रहाची काही नवीन छायाचित्रे समोर आली आहेत, ज्यामुळे संपूर्ण जग थक्क झाले आहे. युरोपियन स्पेस एजन्सीने मंगळाची ही आश्चर्यकारक नवीन छायाचित्रे जारी केली आहेत, जी ग्रहावरील सर्वात मोठ्या ज्वालामुखीचे, ऑलिम्पस मॉन्सचे आहेत.

या ज्वालामुखीची उंची २६ किलोमीटर आहे, जी माऊंट एव्हरेस्टपेक्षा सुमारे तीन पट जास्त आहे. त्याचा पायथा ६०० किलोमीटरपेक्षा जास्त पसरलेला आहे. यावरून तुम्ही हा ज्वालामुखी किती विशाल आहे याचा अंदाज लावू शकता. या छायाचित्रात केवळ ज्वालामुखीचा आकारच नाही, तर काही नवीन माहिती समोर आली आहे, ज्यामुळे जग थक्क झाले आहे. येथे थिजलेल्या लाव्हाच्या जीभेसारख्या रचना सापडल्या आहेत.

यासोबतच खाली एक रहस्यमय घोड्याच्या नालेच्या आकाराची कालव्यासारखी रचना दिदसली आहे. शास्त्रज्ञांना वाटते की हा कदाचित तो मार्ग असू शकतो, जिथून ज्वालामुखीच्या तळाशी पाणी वाहत होते. तथापि, ईएसएच्या मते, हा फक्त घट्ट लाव्हापासून बनलेला एक खडक आहे, जो मंगळाच्या पृष्ठभागावर पाणी घेऊन आला असावा. ईएसएच्या मार्स एक्स्प्रेस ऑर्बिटरने ही छायाचित्रे घेतली आहेत. ही ज्वालामुखीची आणि कदाचित जलविज्ञान शक्तींची आतापर्यंतची सर्वात स्पष्ट छायाचित्रे आहेत.

या चित्रांमध्ये एक ९ किलोमीटर उंच उभट खडक किंवा कडा दिसत आहे, ज्याने संपूर्ण ऑलिम्पस मॉन्सला वेढले आहे. हा खडक खूप जुन्या विशाल भूस्खलनामुळे तयार झाला होता, ज्यामुळे मंगळ ग्रहाच्या मैदानावर शेकडो किलोमीटर दूरपर्यंत ढिगारे पसरले होते. मंगळाचा दक्षिण-पूर्व किनारा लावा क्षेत्राचे दर्शन घडवतो. या ठिकाणी एकेकाळी वितळलेले खडक खाली वाहत होते. हे प्रवाह पंख्याच्या आकाराच्या ठेवींमध्ये पसरले. यामुळे चॅनेल तयार झाले आणि घट्ट खडकात थंड होण्यापूर्वी नळ्या बनल्या. काही लाव्हा प्रवाह गुळगुळीत, गोलाकार जीभांप्रमाणे बनले. मैदानी भागांपर्यंत पोहोचण्यापूर्वी वितळलेले पदार्थ कोठे मंदावले आणि गोठले, हे यावरून कळते.

## मेक्सिकोजवळ दिसले तोंडात दात असलेले जिवंत व्हेल

मेक्सिकोच्या किनाऱ्याजवळ अथक संशोधनानंतर, दुर्मीळ 'तोंडात दात असलेले' व्हेल (Tusked Whales) पहिल्यांदाच समुद्रात जिवंत असतानाच पाहिले गेले आहेत आणि त्यांचे फोटो काढण्यात यश आले आहे. नुकतेच दिसलेले हे सिटेसियन प्राणी जिन्कगो-टूथेड बीक्ड व्हेल (Mesoplodon ginkgodens) या नावाने ओळखले जातात. यापूर्वी हे व्हेल फक्त मेलेल्या अवस्थेत, किनाऱ्यावर वाहून आलेल्या किंवा अपघाताने मासेमारीच्या जाळ्यात अडकलेल्या प्राण्यांवरूनच ज्ञात होते. बीक्ड व्हेलसाठी ही परिस्थिती असामान्य नाही. कारण, ते खोल पाण्यात डुबकी मारणारे आणि अतिशय रहस्यमय असतात. ते आपले आयुष्य किनाऱ्यापासून दूर खोल समुद्रात घालवतात.


ओरेगॉन स्टेट युनिव्हर्सिटीमधील मरीन मॅमल इन्स्टिट्यूटचे संलग्न आणि या अभ्यासाचे सह-लेखक रॉबर्ट पिटमॅन यांनी सांगितले की, 'बीक्ड व्हेल हे या पृथ्वीवरील सर्वात मोठे, पण सर्वात कमी माहिती असलेले प्राणी आहेत. एक टनापेक्षा जास्त वजन असलेले जीव अजूनही पृथ्वीवर आहेत आणि ते जिवंत अवस्थेत कधीही ओळखले गेले नाहीत, याचा विचार करणे रोमांचक आहे. 'उत्तर पॅसिफिकमध्ये एका विशिष्ट इकोलोकेशन पल्सची (प्रतिध्वनी स्पंदन) नोंद झाली, ज्यामुळे या रहस्यमय प्राण्यांचा शोध सुरू झाला. संशोधकांनी २०२० मध्ये या रहस्यमय सोनार सिग्नलसाठी जबाबदार असलेल्या प्राण्यांचा शोध सुरू केला. जून २०२४ मध्ये, या शोधामुळे त्यांना एकटा बीक्ड व्हेल दिसला. या पहिल्या दर्शनानंतर काही दिवसांतच, टीमला व्हेलचा एक छोटा समूह सापडला, ज्यात एका लढाईत जखमी झालेला प्रौढ नर, एक प्रौढ मादी आणि तिचे पिल्लू यांचा समावेश होता.

बीक्ड व्हेलच्या प्रजातींना वेगळे ओळखणे खूप कठीण असते, त्यामुळे केवळ निरीक्षण करणे पुरेसे नव्हते. टीमने एका व्हेलवर क्रॉसबो वापरून डीएनए नमुना गोळा केल्यानंतरच, त्यांनी पाहिलेल्या प्राण्यांची ओळख निश्चित केली. (काळजी करू नका, व्हेल पूर्णपणे सुरक्षित आहे.) संशोधकांनी त्यांचे निष्कर्ष २८ जुलै रोजी 'मरीन मॅमल सायन्स' या जर्नलमध्ये ऑनलाईन प्रकाशित केले, जे आगामी जानेवारी २०२६ च्या अंकात प्रकाशित होईल. या अभ्यासाच्या प्रमुख लेखिका एलिझाबेथ हेंडरसन, ज्या नेव्हल इन्फॉर्मेशन वॉरफेअर सेंटर, पॅसिफिक येथे बायोअकॉस्टिक संशोधक आहेत, त्यांनी सांगितले की, या निष्कर्षांमुळे जिद्द आणि हार न मानण्याचे फायदे दिसून आले. हेंडरसन म्हणाल्या, 'मी आणि या ट्रिपमधील काही लोकांनी (गुस्तावो कार्डिनास, जे बार्लो) या व्हेलचा शोध घेण्यासाठी पाच वर्षे घालवली; त्यांना शोधण्यासाठी आम्ही २०२० पासून दरवर्षी बाजाजवळ शोध घेतला आणि त्या प्रयत्नाचे मोठे बक्षीस आम्हाला मिळाले.'



## धोका दक्षिण अटलांटिक विसंगतीचा

पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामधील छिद्र वेगाने विस्तारत आहे. याचा आकार अंदाजे ५ दशलक्ष चौरस किलोमीटरपेक्षा जास्त झाला आहे. हे छिद्र प्रत्यक्षात पृथ्वीचे कमकुवत चुंबकीय क्षेत्र आहे. यामुळे अवकाशातील किरणोत्सर्गाचे उच्च स्तर कमी उंचीवर पोहोचू शकतात. यामुळे भारतीय सॅटेलाईटस्ना याचा धोका निर्माण होऊ शकतो. डेली गॅलेक्सीच्या अहवालानुसार, हे छिद्र दक्षिण अटलांटिक महासागरावर आहे.




चुंबकीय क्षेत्रातील छिद्राला दक्षिण अटलांटिक विसंगती(SAA) म्हणतात. हे असे क्षेत्र आहेत जिथे पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र बाहेरच्या दिशेने वाकण्याऐवजी आतल्या दिशेने वाकते, जे द्रव बाह्य गाभा आणि घन आवरण यांच्या सीमेवर तयार होते. युरोपियन स्पेस एजन्सीच्या स्वार्म मिशनमधील नवीन डेटा, जो पृथ्वीच्या गाभा, कवच आणि आयनोस्फीअरमधून चुंबकीय सिग्नल यांचा अभ्यास करतो, या डेटानुसार आफ्रिकेच्या नैऋत्येकडील एक क्षेत्र विशेषतः वेगाने विकसित होत आहे. हे दक्षिण अटलांटिक विसंगती क्षेत्र, जे आता ५ दशलक्ष चौरस किलोमीटरपेक्षा जास्त व्यापते, ते भारताच्या एकूण आकारापेक्षा ३.२ दशलक्ष चौरस किलोमीटर म्हणजेच १.७ पट मोठे आहे. दक्षिण अटलांटिक विसंगती, कमकुवत पृथ्वी चुंबकीय क्षेत्र, उपग्रहांना किरणोत्सर्गाच्या संपर्कात आणत आहे, ज्यामुळे डेटा करप्शन, सेन्सर बिघाड आणि सेंसेटिव्हापार्टमध्ये बिघाड यासारखे धोके वाढत आहेत. हा प्रदेश अवकाशातील किरणोत्सर्गासाठी असुरक्षित बनतो आणि उपग्रहांना धोका वाढतो. युरोपियन स्पेस एजन्सीच्या स्वार्म मिशनच्या नवीन आकडेवारीनुसार, ही विसंगती वेगाने वाढत आहे आणि असममितपणे विकसित होत आहे. हे विशेषतः आफ्रिकेच्या नैऋत्य प्रदेशात स्पष्टपणे दिसून येते.

सध्या, हे क्षेत्र अंदाजे ५ दशलक्ष चौरस किलोमीटरपर्यंत विस्तारले आहे, जे भारताच्या आकाराच्या १.७ पट आहे. दक्षिण अटलांटिक विसंगतीच्या कमकुवत चुंबकीय क्षेत्रामुळे उपग्रहांना किरणोत्सर्गाचा धोका निर्माण होतो. यामुळेच भूभौतिकीय जटिलता आणि तांत्रिक परिणाम शास्त्रज्ञांसाठी चिंतेचा विषय बनले आहेत. शास्त्रज्ञ या विसंगतीचा सतत अभ्यास करत आहेत, जेणेकरून त्याचा परिणाम आणि भविष्यातील संभाव्य धोके समजून घेता येतील. जर वेळीच खबरदारी आणि सुरक्षिततेचे उपाय केले नाहीत तर ते पृथ्वीच्या चुंबकीय प्रणाली आणि तांत्रिक पायाभूत सुविधांना गंभीर धोका निर्माण करू शकते.

## पोटात उडणाऱ्या 'फुलपाखरांचे' रहस्य

शरीरात कुठेही वेगवेगळ्या संवेदना जाणवू लागल्यावर त्याला इंग्रजीत 'बटरफ्लाय' म्हणजेच फुलपाखरे उडू लागल्याची उपमा दिली जात असते. परीक्षेपूर्वी, पहिल्या भेटीपूर्वी किंवा सार्वजनिक सभेत बोलण्यापूर्वी, तुमच्या पोटात अशी फुलपाखरे उडत असल्यासारखे जाणवते. पोटात अशा संवेदना जाणवणे हे नर्व्हसनेसचे म्हणजेच घाबरण्याचे एक सामान्य लक्षण आहे. या संवेदना 'गाठ' पडल्यासारख्या किंवा अधिक तीव्र पचनाच्या लक्षणांच्या स्वरूपात देखील प्रकट होऊ शकतात. पण, या भावना



नेमक्या कुठून येतात?

'चिंताग्रस्त पोट' (ervous stomach) हे पचनसंस्था आणि मज्जासंस्था यांच्यातील दुहेरी जोडणीचे एक उत्तम उदाहरण आहे. पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातील क्लिनिकल सायकोलॉजिस्ट मेलिसा हंट यांनी सांगितले : 'गर्भधारणेच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यापासून, मेंदू, पाठीचा कणा आणि पचनमार्ग हे सर्व एकमेकांशी घट्ट जोडलेले असतात. लाखो न्यूरॉन्स म्हणजे चेतापेशी आतड्यांमधून मेंदूपर्यंत माहिती पाठवतात आणि तितकेच न्यूरॉन्स मेंदूकडून आतड्यांना संकेत पाठवतात.' या जोडणीलाच आतडे-मेंदू अक्ष (Gut- Brain Axis) असे म्हणतात. हे संप्रेरके आणि न्यूरोट्रांसमीटर, रासायनिक संदेशवाहक, यांच्याद्वारे नियंत्रित होते. तसेच, हे मेंदू आणि आतडे यांच्यातील थेट मज्जातंतू जोडणी आणि जीवाणू यांच्याद्वारे देखील नियंत्रित केले जाते.

तुमच्या मनःस्थितीचा तुमच्या उर्वरित शरीरावर परिणाम का होतो आणि याउलटही का होते, याचे हे एक प्रमुख कारण आहे. आयर्लंडमधील युनिव्हर्सिटी कॉलेज कॉर्क येथील शरीरशास्त्र आणि न्यूरोसायन्सचे प्राध्यापक जॉन क्रायन यांनी सांगितले : 'जेव्हा आपल्याला पोटात 'फुलपाखरे' जाणवतात, तेव्हा हे एक ज्वलंत स्मरण करून देते की, आपल्या भावना शरीरात खोलवर रुजलेल्या आहेत. शेवटी, पोटात फुलपाखरे उडणे हे 'आतडे-मेंदू अक्ष' कार्यरत असल्याचे दर्शवते. मध्यवर्ती मज्जासंस्था आणि आतडे यांच्यात मज्जातंतू, हार्मोनल आणि सूक्ष्मजीवांच्या मार्गांद्वारे सतत, द्वि-दिशात्मक संवाद सुरू असतो.'

## जगातील सर्वात जुने पिरॅमिड?

इंडोनेशियातील गुनुंग पडांग नावाच्या एका डोंगराळ स्थळावरून आधुनिक पुरातत्त्वशास्त्रात मोठी चर्चा सुरु झाली आहे. पश्चिम जावात स्थित असलेल्या या शिडीदार डोंगराला दीर्घकाळापासून पवित्र मानले जात आहे. २०२३ मध्ये, संशोधकांनी एक शोधनिबंध प्रकाशित केला, ज्यात असा दावा करण्यात आला होता की, गुनुंग पडांग हे जगातील सर्वात जुने ज्ञात पिरॅमिड असू शकते आणि त्याचा इतिहास २५,००० वर्षांपूर्वीचा आहे. हा काळ शेतीचा किंवा संघटित सभ्यतेच्या उदयाच्या खूप आधीचा आहे.



या अभ्यासाचे प्रमुख लेखक, भूगर्भशास्त्रज्ञ डॅनी हिलमन नटाविदजाजा यांनी असा युक्तिवाद केला की, जमिनीखाली दडलेल्या अनेक-स्तरीय संरचनेत प्रगत बांधकाम तंत्रांचे संकेत आहेत. जर हा दावा खरा ठरला असता, तर ही जागा सध्याच्या सर्वात जुन्या प्रमाणित स्थळ असलेल्या गोबेकली टेपेपेक्षाही १४,००० वर्षांनी जुनी ठरली असती. या दाव्यानंतर लगेचच, पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि भूगर्भशास्त्रज्ञांनी तीव्र आक्षेप नोंदवले. त्यांनी या निष्कर्षांना काल्पनिक म्हटले आणि सांगितले की, ते पारंपरिक पुरातत्त्वीय पुराव्यांवर आधारित नाहीत. काही महिन्यांच्या आत, आर्कियोलॉजिकल प्रॉस्पेक्टेशन नावाच्या मासिकाने अपुरा डेटा आणि कार्यप्रणालीतील त्रुटी यांचे कारण देत हा शोधनिबंध मागे घेतला.

नटाविदजाजा यांच्या टीमने जमिनीखाली चार थर शोधले होते. त्यांनी रडार आणि ड्रिलिंग सारख्या पद्धतींचा वापर केला. त्यांना खडकाळ थरांमधून मिळालेल्या मातीच्या नमुन्यांच्या रेडिओकार्बन डेटिंगमधून असे आढळले की, ते २५,००० ईसापूर्व इतके जुने असू शकतात. लेखकांनी याला मानवी बांधकामाचा पुरावा मानला, ज्यात स्तंभाकार खडक आणि भूमिगत खोल्या समाविष्ट आहेत, जे पिरॅमिडसारखी रचना तयार करतात. डॉ. फ्लिंट डिबल यांसारख्या पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी सांगितले की, हा शोधनिबंध त्याच्या निष्कर्षांचे समर्थन करत नाही.

वैज्ञानिकांनी स्पष्ट केले की, मातीची रेडिओकार्बन डेटिंग केवळ मातीतील सेंद्रिय पदार्थांचे वय सांगते, बांधकामाचे नाही. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची हत्यारे किंवा अवजारे, मानवी हाडे, भांडी किंवा नक्षीकाम यांचे पुरावे आढळले नाहीत, जे मानवी क्रियाकलापांची पुष्टी करू शकतील. गुनुंग पडांगच्या भूमिगत संरचनेचे वय आणि स्वरूप यावर पुरातत्त्व समुदाय आणि भूगर्भशास्त्रज्ञांमध्ये अजूनही एकमत झालेले नाही, ज्यामुळे हे ठिकाण आधुनिक विज्ञानासाठी एक मोठे कोडे बनून राहिले आहे.

# महसूल विषयक तक्रारी आणि प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर'

नगर – सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसूल विषयक तक्रारी व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात मार्च ते मे २०२६ या कालावधीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक १' राबविण्यात येणार आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करणे तसेच डिजिटल सेवा सक्षमपणे उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या १८ फेब्रुवारीच्या शासन निर्णयानुसार राज्यभर हे अभियान राबविण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात महसूल मंडळ स्तरावर ७ व १४ मार्च तसेच १० व १७ एप्रिल रोजी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. नगरपरिषद व नगरपंचायत स्तरावर ८ व १५ मे रोजी शिबिरे पार पडतील. पहिल्या टप्प्यात ७ मार्च रोजी अहिल्यानगर, नेवासा, श्रीगोंदा, पारनेर, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड, संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, राहुरी, राहता व कोपरगाव या तालुक्यातील विविध मंडळ विभागांमध्ये शिबिरे होणार आहेत.

या शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा व आठ–अ उताऱ्यांची दुरुस्ती, डिजिटल सातबारा वितरण, तसेच उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन–क्रीमीलेयर प्रमाणपत्रे वितरीत केली जातील. यासोबतच एक खिडकी योजना, ई–मोजणी, ई–फेरफार, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान संदर्भातील सेवा, भूसंपादन व अकृषक परवानगी प्रकरणी गाव दप्तर अद्ययावत करणे, विद्यार्थ्यांना विविध दाखले देणे, तुकडेबंदी कायद्यांतर्गत प्रकरणांचे परीक्षण व सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील मंजुरी आदेशांचे वितरण केले जाणार आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील नवीन तरतुदी, अकृषक रूपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी आवश्यक नसल्याची बाब, सनद प्रणाली संपुष्टात आल्याची माहिती, एकवेळ अधिमूल्य भरणा प्रणाली व महाभूमी पोर्टलवरील डिजिटल सातबाराला असलेल्या कायदेशीर वैधतेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांना समन्वयाचे निर्देश दिले आहेत. याकामी लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था व माध्यम प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या महसूल विषयक प्रकरणांसह व संबंधित कागदपत्रांसह या नियोजित शिबिरात उपस्थित राहून शासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## अहिल्यानगर तालुक्यात 'महसूल समाधान शिबिरांचे' आयोजन

**तालुक्यातील अधिकाधिक नागरिकांनी शिबिरांचा लाभ घ्यावा : तहसीलदार संजय शिंदे**

नगर – शासनाने राज्यभर छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा – १ राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार अहिल्यानगर तालुक्यात ७ मार्च ते १५ मे या कालावधीत मंडळस्तरावर एकदिवसीय शिबिरे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार संजय शिंदे यांनी तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. तालुक्यातील अधिकाधिक नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

श्री. शिंदे म्हणाले, सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न तातडीने निकाली काढणे, तक्रारींचा सत्वर निपटारा करणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

अभियानात विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे दाखले देणे, ग्रीस्टॅक, पी. एम. किसान नोंदणी करणे, ग्राम विकास विभागामार्फत जन्म–मृत्यू दाखल्यांची नोंद करणे, पोटखराबा वहितीखाली आणणे, बळीराजा शेत पाणंद रस्ते मजबुतीकरण करणे, घरकुलाकरिता शासकीय पट्टे वाटप करणे, घरकुलासाठी मोफत वाळू वाटप करणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ देणे, मृदा व जल संधारणाबाबत जनजागृती करणे, अकृषिक जमीन सुधारणाबाबत मार्गदर्शन करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक जमिनीची कमी–जास्त पत्रके तयार करणे व गावदप्तरी अंमल घेणे, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती करणे, भोगवटादार वर्ग–२ ची जमीन वर्ग–१ करणे, आधार कार्ड दुरुस्ती करणे, आरोग्य तपासणी, रेशनकार्डमध्ये नाव कमी करणे किंवा समाविष्ट करणे, लक्ष्मी मुक्ती योजनेचे अर्ज स्वीकारणे आदी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही श्री. शिंदे यांनी दिली.

शिबिराची सुरुवात ७ मार्च रोजी रुई छत्तीशी मंडळापासून करण्यात येत असून, हे शिबीर श्रीराम सांस्कृतिक भवन, दहिगाव येथे होईल. केडगाव मंडळासाठी १० मार्च रोजी महानुभाव आश्रम, आरणगाव येथे, तर १३ मार्च रोजी नालेगाव मंडळासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर, दरेवारी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १४ मार्च रोजी नागापूर मंडळासाठी ग्रामपंचायत सभामंडप, शिंगवेनाईक येथे शिबीर पार पडेल.

तसेच, ९ एप्रिल रोजी सावेडी मंडळासाठी अपर तहसील कार्यालय, अहिल्यानगर व चास मंडळासाठी ग्रामपंचायत सभामंडप, चास येथे शिबिरे होतील. १० एप्रिल रोजी वाळकी मंडळासाठी राजयोग मंगल कार्यालय, वाळकी येथे, ८ मे रोजी भिंगार मंडळासाठी देशमुख मंगल कार्यालय, भिंगार येथे आणि ९ मे रोजी जेऊर मंडळासाठी बायजामाता मंगल कार्यालय, जेऊर येथे आयोजन करण्यात आले आहे.

चिंचोडी पाटील मंडळासाठी ११ मे रोजी लिलाई मंगल कार्यालय, चिंचोडी पाटील व कापूरवाडी मंडळासाठी १५ मे रोजी बानेश्वर मंगल कार्यालय, बुऱ्हाणनगर येथे शिबीर होईल. सर्व ठिकाणी ही शिबिरे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहेत.

शिबिरात विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन, अर्ज स्वीकृती, तक्रारींचे निवारण तसेच प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहनही श्री. शिंदे यांनी केले.

## अहिल्यानगर जिल्ह्यात १४ वर्षीय मुलींसाठी ९ मार्चपासून 'एचपीव्ही' लसीकरण मोहीम

नगर – जिल्ह्यात ९ मार्च ते ८ जून या कालावधीत १४ वर्षे पूर्ण केलेल्या व १५ वर्षे पूर्ण न केलेल्या मुलींसाठी HPV लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. २८ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय स्तरावर शुभारंभ करण्यात आला असून ८ मार्च रोजी महिला दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली याचा राज्यस्तरीय शुभारंभ होईल, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी दिली. सदर लसीकरणामुळे महिलांमधील गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून प्रतिबंध होतो.

या मोहिमेत एकूण लोकसंख्येच्या सुमारे १ टक्का लाभार्थी अपेक्षित असून त्यांना गार्डासिल–४ या लसीचा एकच डोस देण्यात येईल. ही लस ०.५ मिली इतकी डाव्या दंडाच्या वरच्या भागात स्नायूमध्ये दिली जाईल.

लसीकरण सत्र सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत चालेल व सर्व पात्र लाभार्थ्यांची तसेच दिलेल्या लसीची नोंद यू–विन पोर्टलवर केली जाणार आहे. लसीकरणापूर्वी लाभार्थी उपाशी पोटी नसेल याची पालकांनी खात्री करावी. लस देण्याआधी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून लाभार्थीची तपासणी केली जाईल. प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी योग्य व्यवस्थापन करण्यात आले असून लस घेतल्यानंतर लाभार्थीला तीस मिनिटे लसीकरण सत्राच्या ठिकाणी थांबवले जाईल. तरी समाजमाध्यमांद्वारे पसरविण्यात येणाऱ्या चुकीच्या बातम्या वर व अफवांवर लोकांनी विश्वास ठेवू नये.

मध्यम किंवा तीव्र आजार असलेल्या मुलींना त्या पूर्णपणे बऱ्या होईपर्यंत लस दिली जाणार नाही. ज्या मुलींना मागील लसीकरणामुळे लर्जी आली असेल किंवा यीस्टची लर्जी असेल त्यांना ही लस दिली जाणार नाही. अपेक्षित वयोगटाबाहेरील मुलींना व ज्यांनी यापूर्वी कोणतीही एचपीव्ही लस घेतली असेल त्यांना या मोहिमेत लस मिळणार नाही.

मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी जिल्ह्यातील वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. तसेच गाव पातळीवरील आशा, अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविकांचेही प्रशिक्षण घेण्यात आले आहे. ही मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे व जिल्हा माता–बाल संगोपन अधिकारी डॉ. संदीप पुंड यांनी केले आहे.

## ५ वर्षीय माजीन शेख याने केला रमजानचा पहिला रोजा

नगर – या वर्षी सुरु असलेल्या रमजान महिन्यात मुकुंदनगर येथील शेख माजीन मोहसीन (वय ५) याने पहिला रोजा (उपवास) केला आहे. माजीन शेख हा मौलाना आझाद उर्दू गर्ल्स हायस्कूल शिक्षक शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष अलहाज शेख अब्दुल लतीफ अब्दुल अजीज यांचा नातू आहे.



माजीन हा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विश्रामबाग शाळेत इयत्ता पहिलीत शिकत आहे. अत्यंत कमी वयात, तडतडत्या उन्हात पवित्र रमजानच्या महिन्यात जवळजवळ १३ तासाचा उपवास अन्नपाण्याविना त्याने पूर्ण केला आहे. माजीनने ठेवलेल्या उपवासाचे अम्मी, अब्बू, नाना, नानी, दादी, बडे अम्मी, बडे अब्बू व परिसरातील नागरिकांनी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

## राहाता तालुक्यात 'महाराजस्व समाधान शिबिरांचे' आयोजन

**७ मार्चला बाभळेश्वर येथे पहिले शिबिर**

शिर्डी – महसूल व अन्य शासकीय विभागांच्या विविध सेवा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व महिलांपर्यंत एकाच ठिकाणी पोहोचवण्यासाठी राहाता तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा–१)' राबवण्यात येत आहे. याअंतर्गत पहिले एकदिवसीय शिबिर ७ मार्चला सकाळी १० वाजता बाभळेश्वर येथे होणार असून, नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार अमोल मोरे यांनी केले आहे.

या मंडळस्तरीय शिबिरांमध्ये प्रामुख्याने दाखले वाटप, सातबारा (७/१२) अद्ययावतीकरण, अभिलेख दुरुस्ती, ग्रीस्टॅक आणि ई–मोजणी यांसारख्या सेवा दिल्या जातील. यासोबतच आयुष्मान भारत कार्ड व 'माझी लाडकी बहीण' योजनेसह इतर प्रलंबित 'ई–केवायसी' पूर्ण करण्याची सुविधाही एकाच छताखाली उपलब्ध करून दिली जाणार आहे.

बाभळेश्वरमधील पहिल्या शिबिरानंतर तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी १४ मार्च रोजी अस्तगाव, १० एप्रिल – लोणी, १७ एप्रिल– पुणतांबा, ८ मे – राहाता, १५ मे – शिर्डी येथे शिबिर पार पडणार आहेत.

## शासकीय आदर्श आश्रमशाळांमध्ये इयत्ता पाचवी प्रवेशासाठी १२ एप्रिल रोजी पूर्व परीक्षा

नगर – महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागांतर्गत नाशिक विभागाच्या विद्यानिकेतन धर्तीवर चालविल्या जाणाऱ्या शासकीय आदर्श आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी इयत्ता ५ वी मध्ये प्रवेश देण्यासाठी १२ एप्रिल रोजी प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ३१ मार्च पर्यंत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर येथे सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

नाशिक विभागांतर्गत शासकीय आदर्श आश्रमशाळा भंडारदरा (कॅम्प मवेशी), ता. अकोले व शासकीय आदर्श आश्रमशाळा देवमोगरा, ता. नवापूर, जि. नंदुरबार या शाळांमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. या शाळांमध्ये प्रवेशासाठी दरवर्षी शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपूर्व परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार पुढील शैक्षणिक वर्षात ५ वीत प्रवेश दिला जातो.

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी प्रवेश मिळविण्यासाठी चालू शैक्षणिक वर्ष (२०२५–२६) मध्ये चौथीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा १२ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे कन्या विद्यालय, अकोले, ता. अकोले हे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे.

परीक्षेसाठी शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेले अनुसूचित जमाती व आदिम जमातीचे विद्यार्थी पात्र राहतील. प्रवेशार्थी विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (रहिवासी) असणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाखापेक्षा अधिक नसावे. सदर परीक्षेसाठीचे अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) तसेच या कार्यालयाच्या अधीनस्थ कार्यरत असलेल्या सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये मोफत उपलब्ध आहेत.

इच्छुक विद्यार्थ्यांनी पूर्ण भरलेले अर्ज आणि त्यासोबत पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी (अधिवास) प्रमाणपत्र, विद्यार्थी व पालकांचे आधार कार्ड, तसेच विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह सादर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## सीए फायनल परीक्षेत गितांजली गुरसाळे उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडिया आयोजित सीए परीक्षेत कु.गितांजली नंदकुमार गुरसाळे हि उत्तीर्ण झाली. डाळमंडई, आडते बाजार येथील संतोषी पुष्प भांडार चे संचालक नंदकुमार सुभाष गुरसाळे व सौ.संगीता गुरसाळे यांची ती कन्या आहे. हार व फुलांचा व्यवसाय करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मुलीचे शिक्षण केले आहे. अत्यंत जिद्दीने परिश्रम घेऊन गितांजली गुरसाळे हिने सीए परीक्षेत यश मिळविले आहे. या प्रवासाच्या सुरुवातीस तिला सी ए पवनकुमार दरक यांचे मारगदर्शन लाभले. गितांजली ला के एस एस अँड कंपनीचे सीए कुषल व्हिज्ञन यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच आजी श्रीमती रत्नमाला गुरसाळे यांचे आशीर्वाद लाभले.





आयएमएसच्या विद्यार्थ्यांनी गुजराथ एमआयडीसीला शैक्षणिक भेट दिली.

## आयएमएसच्या विद्यार्थ्यांची गुजराथ एमआयडीसीला शैक्षणिक भेट

नगर – येथील भा.पा.हिवाळे संस्थेच्या आय एम एस या व्यवस्थापन संस्थेतील एमबीए च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल गुजरात मधील सिल्वासा या ठिकाणी जाऊन आली. येथील एमआयडीसी मधील पारले अग्रो, अक्षय किचन, मिन टॉईज या उद्योगांना विद्यार्थ्यांनी भेट दिली. तीनही ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रतिसाद मिळाला. व्यवस्थापनातील बारकावे, विपणन, वित्त, मानव संसाधन, वाहतूक, अशा अनेक विभागांची माहिती शिकायला मिळाली. क्लास मधील शिक्षण व प्रात्यक्षिक ज्ञान यामुळे मुलांच्या मनात असलेली व्यापार क्षेत्रातील प्रतिमा यांचा योग्य मिलाप होतो. त्यातून विद्यार्थी अधिकच चांगल्या पद्धतीने परीक्षेला तसेच मुलाखतीला सामोरे जाऊ शकतो याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो.

या सहलीसाठी संस्थेला वंडर ट्रिप प्रा.ली या कंपनीने सहकार्य केले. तीन दिवसाच्या या सहलीत मुलांची राहण्याची, खाण्याची सर्व व्यवस्था उत्तम करण्यात आली होती. सहलीसाठी आकारण्यात आलेली माफक फी ज्यामध्ये संस्थेने देखील काही भार उचलला. यामुळे अधिकाधिक मुलांनी या संधीचा फायदा घेतला.

सहलीचे नियोजन प्रा श्रुती राव, डॉ. राहुल खंडेलवाल, डॉ. हर्षवर्धन भावसार, प्रा. साक्षी मध्यान यांनी केले.

शैक्षणिक सहल हि विद्यार्थाना एक जिवंत अनुभव देते असे मत यावेळी संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता यांनी केले. यावेळी उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे उपस्थित होते.

## पाचट पेटवल्याने शेतातील दोन शेड जळून खाक; लाखो रुपयां नुकसान

**निष्काळजीपणा केल्याप्रकरणी नालेगावच्या ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर – शेतात उसाचे पाचट पेटवल्याने लागलेल्या आगीत दोन पत्र्याचे शेड जळून खाक झाल्याची घटना नालेगावच्या वारुळाचा मारुती परिसरात ५ मार्च रोजी सकाळी घडली. या आगीत साहित्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याप्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर अशोक घोलप (रा. कसबे वस्ती, तपोवन रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सागर घोलप यांचा लग्न समारंभात सजावट करण्याचा व्यवसाय आहे. त्यांचे व भागीरथ बोडखे यांचे वारुळाचा मारुती परिसरातील कल्याण बाबा गृहनिर्माण संस्थेच्या पाठीमागील भागात पत्र्याचे शेड आहे. ५ मार्च रोजी सकाळी सात ते आठच्या सुमारास अमर वाघ, अनिल वाघ, सचिन वाघ आणि सागर वाघ (सर्व रा. नालेगाव) यांनी या शेड जवळ असलेल्या शेतात उसाचे पाचट कोणतीही पूर्वसूचना न देता निष्काळजीपणे पेटवून दिले. यामुळे पसरलेल्या आगीने घोलप व बोडखे यांच्या शेडमधील साहित्याला वेढा घातला.

या आगीत दोन लाख रुपयांचे सजावटीचे दोन संच, एक लाख रुपयांचे एक स्वयंचलित चपाती यंत्र, एक लाख रुपयांचे सत्तर मेजांचे दोन भोजन संच, एक लाख रुपयांचे सजावटीचे साहित्य, विद्युत तारा व तीस शोपीस आणि दोन लाख रुपयांचे दिवाळीचे साहित्य, राख्या, कुलर व पिठाच्या गिरण्या असे एकूण सात लाखांचे साहित्य भस्मसात झाले आहे. अग्नीशमन दलाच्या साहाय्याने आग विझवण्यात आली, परंतु तोपर्यंत सर्व साहित्य जळून राख झाले होते. घटनेनंतर फिर्यादी सागर घोलप यांनी दिलेल्या माहितीनुसार, निष्काळजीपणा केल्याप्रकरणी वरील चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## विद्यार्थ्यांनी विज्ञान संवादक होण्याची गरज : डॉ. दीप्ती सिधये




डॉ. दीप्ती सिधये यांचा सत्कार करताना प्राचार्य बाळासाहेब सागडे आदी.

नगर – केवळ विज्ञानात रुची असून चालणार नाही, तर विज्ञान सोप्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विज्ञान लोकांच्या दैनंदिन जीवनात कसे उपयोगी ठरते हे गाणी, कविता आणि समाजमाध्यमांमधून सामान्य जनतेला समजावून सांगण्याची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विज्ञान संवादक बनण्याची तयारी करावी, असे आवाहन डॉ. दीप्ती सिधये यांनी केले.

न्यू आर्टस, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजमधील राजर्षी शाहू महाराज सभागृहात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे होते. उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे यांच्यासह सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.दीप्ती सिधये म्हणाल्या, विज्ञान हे कोणाचेही शत्रू नाही. मात्र भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांकडे अनेकदा सावत्रपणे पाहिले जाते. कविता आणि गाण्यांच्या माध्यमातूनही विज्ञान लक्षात ठेवता येते. विद्यार्थ्यांनी यासाठी आतापासूनच तयारी केली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता गुणात्मक अभ्यासाला महत्त्व द्यावे. सभागृहात बसलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांपैकी कोणी तरी भविष्यात नोबेल पारितोषिक विजेता असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते वर्षभरात सेट, नेट आणि पीएच.डी. प्राप्त केलेल्या प्राध्यापकांचा तसेच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विज्ञान दिनानिमित्त माहितीपटही दाखविण्यात आला. प्रास्ताविक विज्ञान मंडळाचे संचालक डॉ. एस. बी. गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. अशोक जाधवर यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सारिका देशमुख आणि डॉ. अपर्णा कुलकर्णी यांनी केले. डॉ. अनिल आठरे यांनी आभार मानले.





महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नगर शाखेच्या वतीने जागतिक मराठी भाषा दिन निमित्त आयोजित कार्यक्रमाममध्ये अनिरुद्ध देवचक्के, अध्यक्ष प्रा. डॉ. च. वी. जोशी, महिला बालरोग तज्ञ डॉ. चेतना बहुरूपी पाटील आदी. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले विद्यार्थी.

## म.सा.पा. नगर शाखेच्यावतीने जागतिक मराठी भाषा, कवी कुसुमाग्रज जयंती दिन साजरा

नगर – मराठी ही समृद्ध आणि अभिजात परंपरा लाभलेली भाषा असून ती महाराष्ट्र राज्यातील मराठी माणसाची वैभव आहे. दैनंदिन जीवनात मराठीचा युवा पिढीने जास्तीत जास्त वापर करावा यासाठी युवा वर्गामध्ये वाचनाची आवड व गोडी रुची निर्माण होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन न्यूक्लियस हॉस्पिटलच्या संचालिका महिला बालरोग तज्ञ डॉ. चेतना बहुरूपी पाटील यांनी जागतिक मराठी भाषा गौरव दिन, कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर अध्यक्ष पदावरून बोलताना व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नगर शाखेच्या वतीने प्रयत्न नर्सिंग स्कूल गुलमोहर रोड येथे कार्यक्रमासाठी म.सा.पा.चे माजी अध्यक्ष अनिरुद्ध देवचक्के हे होते. यावेळी पाठक सर व नगर म.सा.पा.चे प्रभारी अध्यक्ष प्रा. डॉ. च. वी. जोशी, राजेंद्र चोभे, शिवाजी साबळे, डॉ. विश्वास काळे व स्कूलच्या प्राचार्य मस्के मॅडम, उद्योजक धुमाळ, सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते. उपाध्यक्ष प्रा. दशरथ खोसे यांनी प्रास्ताविक केले.

